सुटट्या लागल्या
भाच्यांना, बहिणीला कपडे घ्यायचेत...?
चला तर मग मयुरी मॉलला
बाबा सूट फ्रॉक पार्टीवेअर ड्रेस व बरेच काही
१५-१६ वर्षापर्यंतच्या मुला-मुलींसाठी
सर्वांसाठी सर्व प्रकारचे कपडे
असंख्य नवनवीन व्हरायटीज्
होलसेल पेक्षाही कमी दरात
अहमदनगर जिल्ह्यातील प्रथम भव्य लेडीज मॉल
मयुरी लेडीज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहमदनगर. 9028201188



संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २०.०५.२०२५ | अंक नं. ४२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्टुरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222



फक्त फायदाच फायदा!
खरेदीवर पॉइंट पॉइंटसवर गिफ्ट
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090



22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%* पर्यंत सूट
ठुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्सचेंज करा आणि मिळवा 100%* किंमतीचा परतावा.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02


# नगरमधील गावठाणातील रस्त्यांची झालेली दुर्दशा अणुबॉम्ब पडलेल्या हिरोशिमा शहरासारखी झालीयं

## नागरिकांच्या जीविताला धोका झाल्यास नाईलाजास्तव ठेकेदारांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून आंदोलन करणार

नगर - पावसाळा अवघ्या पंधरा दिवसावर येऊन ठेपलेला असताना, नगरमधील रस्त्यांची अतिप्रचंड दुर्दशा आणि मुख्य म्हणजे गटार सांडपाणी तथा नालेसफाई आणि सीना नदीचे संभावित पूर व्यवस्थापन तसेच नगरमधील गावठाणातील रस्त्यांची दुर्दशा पाहता १९४५ मध्ये हिरोशिमा शहरावर अणुबॉम्ब पडल्यानंतर त्या शहराची जी अवस्था झाली होती, ही अशीच अवस्था संपूर्ण पावसाळाभर नगरकरांना पूर्वीपेक्षाही वाईट पद्धतीने सहन करावी लागेल. त्यामुळे आपल्या शहराचे नाव पुन्हा एकदा बदलून हिरोशिमा किंवा नागासाकी ठेवावे का? असा उपरोधिक सवाल जागरुक नागरिक मंचने उपस्थित केला आहे. तसेच पालकमंत्र्यांनी खरे खरे पालक असल्यासारखे नगर शहराकडे विशेष लक्ष देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

याबाबत राज्याचे मुख्यमंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी तसेच महापालिका आयुक्तांना पाठविलेल्या निवेदनात मंचचे अध्यक्ष सुहास मुळे यांनी म्हटले आहे की, विकासकामे कशी नसावीत? याचे उत्कृष्ट उदाहरण सध्या शहरामध्ये चालू आहे. एकदमच सगळीकडचे रस्ते खोदून अधिकारी, पुढारी आणि ठेकेदार या त्रिदेव लोकांनी हा विकासाचा पराक्रम केला आहे. सगळेच्या सगळे अंतर्गत रस्ते एकाच वेळी खोदून ठेवून एकाचवेळी सगळा दळणवळण बंद करण्याचा महामूर्खपणा आपल्या शहरातच होऊ शकतो. नागरिकांना जाण्यासाठी अगदी गल्लीबोळात सुद्धा पर्यायी रस्ता सुद्धा ठेवला नाही.

### ५ मिनिटे पाऊस झाला तरी चौकाचौकात साचतेयं तळे

अगदी चमचाभर म्हणजे पाच मिलिमीटर पाऊस पाच मिनिट जरी पडला तरी चौकाचौकांमध्ये स्विमिंग पूल तयार होत आहेत, अजून तर खरा पावसाळा सुरू व्हायचा आहे... मग त्यावेळी काय दाणादाण होईल? याचा विचारही न करणारे इतके विद्वान अभियंते आणि ठेकेदार आपल्याला लाभलेले आहेत. **(पुढील मजकूर व छायाचित्र पान २ वर)**

# कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत २८ मे पूर्वी तोडगा काढा अन्यथा महापालिका युनियनचे 'बेमुदत धरणे आंदोलन'

नगर - महापालिकेतील कामगार-कर्मचाऱ्यांचे अनेक महत्त्वाचे प्रश्न गेल्या कित्येक वर्षांपासून प्रलंबित असून, वेळोवेळी निवेदन, पत्रव्यवहार आणि चर्चेनंतरही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यामुळे कामगार संघटनेकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. २८ मे पर्यंत मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत धरणे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर यांनी दिला आहे.

कामगार संघटनेच्या म्हणण्यानुसार, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ५०६ कोर्ट कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन आयोगाचा फरक २४ समान हप्त्यांमध्ये देण्याचा निर्णय झाला असून, केवळ एक हप्ता दिवाळीपूर्वी अदा करण्यात आला आहे. उर्वरित हप्ते अद्याप देण्यात आलेले नाहीत. याशिवाय, हद्दवाढीतील कामगारांचे फरकाचे तक्ते अद्याप तयार झालेले नाहीत. ६ व्या वेतन आयोगाचे दोन हप्ते कामगारांना मिळालेले नाहीत. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाही फरकाची रक्कम दिलेली नाही. कालबद्ध पदोन्नतीच्या फरकाची रक्कम गेल्या ८-१० वर्षांपासून थांबलेली आहे. वैद्यकीय प्रतिपूर्तीची बिले तात्काळ अदा करणे व ती भविष्यात दरमहा पगारासोबत देणे, निवृत्ती वेतन अंशदान योजनेतील २५० लाभार्थ्यांची रक्कम त्यांच्या खात्यात वर्ग करणे, आणि भविष्य निर्वाह निधीची रक्कम वेळेवर जमा करणे, या मागण्या रखडलेल्या असून, एल.जी.एस.-एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना जादा वेतनवाढ देण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात यावा, तसेच निवड समिती गठित *(पुढील मजकूर पान २ वर)*

# जिल्ह्यात गेल्या १० वर्षांत प्रथमच मे महिन्यात यंदा सर्वाधिक पाऊस

## ७ दिवसांतच ५७.६ मिमी पावसाची झाली नोंद

नगर - हवामान बदलाचा परिणाम सातत्याने नियमित व अनियमित येणाऱ्या पावसावर देखील जाणवत आहे. त्यामुळेच या वर्षी अवकाळी पावसाने जिल्ह्यात कहर केला आहे. गेल्या १० वर्षांत मे महिन्यात यंदा जिल्ह्यात विक्रमी पाऊस झाला आहे. सरासरी ७ दिवसांतच जिल्ह्यात ५७.६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. त्या खालोखाल मे २०२१ मध्ये ३९.६ मिमी पाऊस झाला होता.

(पुढील मजकूर पान २ वर)


डॉ.अद्वैत गिते MBBS, MD (Medicine) DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे * डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यूरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिद्ध निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे



MAHA DISCOUNT offer in Any Course
Just 1800/-
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, CHAT GPT, BANKING, TAXATION
Delhi Gate Branch — 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch — 1st Floor, Amber Plaza, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch — Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769


# भारताचे ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचे निधन

पुणे - भारताचे ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ तथा लेखक डॉक्टर जयंत विष्णू नारळीकर (वय ८६) यांचे २० मे रोजी पहाटे पुण्यातील राहत्या घरी निधन झाले. त्यांना कोणताही आजार नव्हता. त्यांनी झोपेतच शांतपणे अखेरचा श्वास घेतल्याची माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी दिली आहे. त्यांच्या निधनामुळे एक थोर वैज्ञानिक, साहित्यिक व शिक्षण क्षेत्रातील एक तेजस्वी तारा मावळल्याची भावना व्यक्त होत आहे.



डॉक्टर जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील विष्णू वासुदेव नारळीकर हे एक प्रसिद्ध गणितज्ज्ञ व वाराणसीच्या बनारस हिंदू विद्यापीठाच्या गणित शाखेचे प्रमुख होते. तर आई सुमती ह्या संस्कृत विदुषी होत्या. जयंत नारळीकरांचा विवाह १९६६ साली मंगला सदाशिव राजवाडे (गणितज्ज्ञ) यांच्याशी झाला. त्यांना गीता, गिरीजा व लीलावती अशा ३ कन्या या दाम्पत्याला आहेत. कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार जयंत नारळीकरांना कोणताही गंभीर आजार नव्हता. पण वयोमानानुसार त्यांची प्रकृती काहीशी कमी-जास्त होत होती. त्यांनी मंगळवारी पहाटे झोपेतच अखेरचा श्वास घेतला.

डॉक्टर जयंत नारळीकर यांच्या कार्याची दखल अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांनी घेतली आहे. भारत सरकारने खगोल क्षेत्रातील महत्वपूर्ण योगदानाविषयी १९६५ मध्ये त्यांचा पद्मभूषण, तर २००४ मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने गौरव केला. याशिवाय त्यांनी रँग्लर या पदवीसह खगोलशास्त्राचे टायसन मेडल, स्मिथ पुरस्कार व इतरही अनेक सन्मानांवर आपली मोहोर उमटवली आहे. नारळीकरांनी जागतिक पातळीवरही शास्त्रज्ञ म्हणून स्वत:चा वेगळा ठसा उमटवला. त्यांनी सर फ्रेड हॉएल यांच्यासमवेत 'कन्फॉर्मल ग्रॅव्हिटी थिअरी' मांडून जगभरातील शास्त्रज्ञांचे लक्ष वेधून घेतले होते.


आनंद गॅस एजन्सी
महत्त्वाची सूचना - आनंद गॅस एजन्सी ग्राहकांसाठी
प्रिय ग्राहकहो,
आनंद गॅस एजन्सी, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडची अधिकृत एलपीजी वितरक, आपल्या सर्व ग्राहकांना
सूचित करते की एलपीजी सबसिडीचा लाभ घेण्यासाठी आणि सेवा खंडित होऊ नये यासाठी बायोमेट्रिक ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे अत्यावश्यक आहे.
अंतिम मुदत: ३१ जून २०२५
या तारखेनंतर ई-केवायसी न करणाऱ्यांचे एलपीजी कनेक्शन ब्लॉक केले जाईल आणि त्यांना सिलिंडर रिफिल मिळणार नाही.
✅ ई-केवायसी कशी पूर्ण कराल?
1. **आनंद गॅस एजन्सीला भेट द्या** - आमच्या कार्यालयात येऊन बायोमेट्रिक ई-केवायसी पूर्ण करा.
2. **सिलिंडर डिलिव्हरीवेळी** - आमचे डिलिव्हरी कर्मचारी आपल्या घरी येऊन ई-केवायसी करतील.
3. **BPCL मोबाईल ॲप वापरा** - भारत पेट्रोलियमचे ॲप डाउनलोड करून ई-केवायसी प्रक्रिया ऑनलाइन पूर्ण करा.
कृपया खालील कागदपत्रे सोबत आणा:
- आधार कार्डाची झेरॉक्स
- गॅस रिफिलिंग बुक (DGCC - निळी बुक)
ई-केवायसी पूर्ण करा आणि आपल्या एलपीजी सेवांचा लाभ सुरू ठेवा.
धन्यवाद,
* घरेलू सिलिंडरचा पुरवठा संपूर्ण अहिल्यानगर तालुक्यात आणि कमर्शियल सिलिंडरचा पुरवठा पॅन इंडिया स्तरावर.
SERVICES
NEW CONNECTION
CYLINDER REFILLING (DOMESTIC & COMMERCIAL)
TECHNICAL ASSISTANCE
MECHANIC SERVICE ON CALL
LEAKAGE ASSISTANCE (24*7)
PREFFERED TIME CYLINDER DELIVERY
अधिक माहितीसाठी संपर्क करा:
आनंद गॅस एजन्सी
भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडची अधिकृत एलपीजी वितरक
शॉप 1 & 2, स्नेहल अपार्टमेंट, पाइपलाइन रोड, डी-मार्टजवळ, सावेडी, अहिल्यनगर - 414003
anandgasagency2007@gmail.com +91 89993 46549
(FOR COMMERCIAL CYLINDER BOOKING CALL : 9049041115 )

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जिल्ह्यात गेल्या १० वर्षांत प्रथमच मे महिन्यात यंदा सर्वाधिक पाऊस

**७ दिवसांतच ५७.६ मिमी पावसाची नोंद, मे २०२१ मध्ये झाला होता ३९.६ मिमी पाऊस**

(पान १ वरुन)

जिल्ह्यात या महिन्यात ५ मे पासून अधून मधून अवकाळी पाऊस पडत होता. १२ मे पासून त्याने जास्त जोर धरलेला असून १७, १८ आणि १९ मे रोजी या अवकाळी पावसाने आणि वादळाने जिल्ह्याच्या अनेक भागात थैमान घातले आहे. यापूर्वी २० मेनंतर पाऊस होत होता. यंदा मात्र ५ मे पासून पावसाला सुरुवात झाली.

### मे महिन्यात दहा वर्षातील पाऊस

२०१५ - १०.६ मिमी, २०१६ - ३०.२ मिमी, २०१७ - ३.१ मिमी, २०१८ - ४.५ मिमी, २०१९ - ०० मिमी, २०२० - ७.०० मिमी, २०२१ - ३९.६ मिमी, २०२२ - ३.३ मिमी, २०२३ - ०.१ मिमी, २०२४ - २४.७ मिमी, २०२५ - ५७.६ मिमी (२० मे रोजी सकाळी ८ पर्यंत). हवामान बदलामुळे सातत्याने तापमानात वाढ होत आहे. त्यामुळे भविष्यात मे महिन्यात यापूर्वी मध्यम व हलक्या स्वरूपाचा पाऊस होत होता, यापुढे मुसळधार व अति मुसळधार पाऊस होण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### वीजा कोसळून युवकासह जनावरे, पक्षी दगावले

अवकाळी पावसाने अहिल्यानगर जिल्ह्यात कहर केला आहे. मागील १८ दिवसांपासून ढगाळ वातावरणासह हलका व मध्यम स्वरूपाचा पाऊस होत होता. परंतु १८ मे रोजी सकाळी आणि सायंकाळी तसेच १९ मे रोजी दुपारी नगर शहरासह जिल्ह्यातील विविध भागात विजेच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. वादळी वाऱ्यांमुळे पाथर्डी, श्रीगोंदे, राहुरी, श्रीरामपूर, संगमनेर, राहता या भागात मोठे नुकसान झाले. दरम्यान, सोमवारी दुपारी राहुरी तालुक्यातील रामपूर-कोल्हार भागातील लक्ष्मीवाडी येथे वीज कोसळून राहूल पठारे (वय ३७) या युवकाचा मृत्यू झाला. तर पाथर्डीत एक म्हैस व वृक्षांवर बसलेल्या चिमण्यांवर वीज कोसळली व जामखेडमध्येही एक बैल दगावला. शहरात तर सात ठिकाणी वृक्ष उन्मळून पडले.

जिल्ह्यात काही ठिकाणी तुरळक, काही ठिकाणी मध्यम तर काही भागात विजेच्या कडकडट्यासह पाऊस झाला. यंदा अवकाळीचे दिवस वाढले असून, पुढचे काही दिवस देखील पावसाचे राहण्याचा अंदाज आहे. दरम्यान, जिल्ह्यात २० ते २२ मे दरम्यान विजेच्या कडकट्यासह वादळी वारा, अतिवृष्टीच्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. २३ मे रोजी वादळासह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला. हवामान विभागाने येलो अलर्ट जारी केला. जिल्हा प्रशासनाने देखील वादळी वाऱ्यासह पावसाच्या अंदाजामुळे सतर्क राहण्याचे आदेश नागरिकांना दिले आहेत.

### ठिकठिकाणी पाणी साचले, उपनगरात वृक्ष पडले

शहर परिसरात १९ मे रोजी बोल्हेगाव येथील जिल्हा परिषद शाळेसमोरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला. तसेच, कोठी रोडवरील झोपडपट्टी परिसरात ठिकठिकाणी पाण्याचे तळे साचले होते. काही घरात किरकोळ पाणी शिरले होते. तसेच, सोना नगर चौक, डॉन बॉस्को जवळ, सावेडी जॉगिंग ट्रॅक जवळ, अष्टविनायक कॉलनी, बोल्हेगाव व परिसरातील प्रेमभारती नगर (जय भवानी चौकाजवळ) येथे झाडे उन्मळून पडली.

महापालिकेचे आपत्ती व्यवस्थापन प्रमुख शंकर मिसाळ, उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजान यांनी घटनास्थळी जाऊन व कर्मचारी पाठवून झाडे हटवून रस्ते मोकळे करून दिले.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
"मुसाफिर"-९८२२०२०६९१



### ट्रम्प यांचा शैक्षणिक क्षेत्रातही धमाका

जगभरात टॅरीफ बॉम्बचे स्फोट घडवल्यानंतर ट्रम्प प्रशासनाने आता शैक्षणिक क्षेत्रातही मोठे निर्णय घेण्यास प्रारंभ केलाय.

मागील महिन्यात कोलंबिया विद्यापीठाचा ४०० दशलक्ष डॉलर निधी कमी केला. त्यावरून निदर्शनेही झाली. पण अलीकडे त्यांच्या काही मागण्या मान्य करून कोलंबिया विद्यापीठाच्या विकासाचा मार्ग खुला ठेवला गेला.

आता वाद आहे अमेरिकेतल्या सर्वात जुन्या व प्रतिष्ठित हॉर्वर्ड विद्यापीठासंदर्भाचा! ट्रम्प प्रशासनाने प्रशासकीय व नेतृत्वविषयक बदल आणि कॅम्पसच्या विविधता भूमिका, प्रवेश धोरण, काही विद्यार्थी क्लबची रद्दता इ. विषयी मागणीवजा पत्र दिले आहे. पण हॉर्वर्डचे अध्यक्ष अॅलम गार्बर यांनी या मागण्यांपुढे झुकणार नसल्याचे सांगितल्याने लगेचच ट्रम्प सरकारने विद्यापीठाचा अब्जावधी डॉलरचा निधी गोठवला आहे.

वास्तविक अमेरिकेत विद्यापीठांना विदेशी विद्यार्थ्यांकडून मोठे शुल्क मिळते. त्याशिवाय संघ सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानावरही विद्यापीठातील संशोधनाची मदार अवलंबून असते. निधी गोठवल्याने वैद्यकीय व इतर संशोधन व नवीन उपक्रमांना गंडांतर येईल.

अमेरिकेतल्या विदेशातून येणाऱ्या ११-१२ लाख विद्यार्थ्यांत आपल्या भारताचे विद्यार्थी सर्वाधिक आहेत.

हॉर्वर्ड विद्यापीठाने ट्रम्प प्रशासनाला, पत्राला वाटाण्याच्या अक्षता दाखवल्याने रागावलेल्या प्रशासलनाने सध्या हॉव४र्डचा निधी २.२ अब्ज डॉलर्सनी गोठवला.

अनेक माजी विद्यार्थी, माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा हे हॉर्वर्डच्या बाजूने लढत आहेत. या दोघांच्या वादात विद्यार्थी, शिक्षण, संशोधन यांना फटका बसू नये हीच अपेक्षा. सारांश, या वादात ट्रम्प प्रशासनासह हॉर्वर्डच्या प्रतिमेलाही काहीसा तडा गेलाय.

आपल्या भारतीय विद्यापीठांना जागतिक दर्जा गाठण्यास फार मेहनत घ्यावी लागेल. त्यासाठी सरकारनेही त्यांना भरीव सहाय्य दिले पाहिजे.

**- किशोर गांधी**



वारंवार खंडीत होणारा वीजपुरवठा पूर्ववत सुरळीत व्हावा, या मागणीचे निवेदन भारतीय जनता पक्षाच्यावतीने महावितरणला देताना पदाधिकारी.

# सावेडी उपनगरामध्ये वारंवार खंडीत होणारा वीजपुरवठा पूर्ववत सुरळीत करा

नगर - सावेडी उपनगरामध्ये गेल्या एक-दीड महिन्यापासून वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे नागरिक व्यापारी दुकानदार अत्यंत त्रस्त झालेले आहेत. दिवसभरातून किमान चार ते पाच वेळा वीज पुरवठा खंडित होत असतो. याचा मनःस्ताप सर्व नागरिकांना सहन करावा लागतो आहे. त्यामुळे त्यांच्या मनात सरकारबद्दल रोष निर्माण होत चाललेला आहे. वास्तविक पाहता महानगरपालिकेने आपल्या मागणीनुसार सावेडी उपनगराकरिता विद्युत उपकेंद्रासाठी काही वर्षांपूर्वी विनामोबदला जागा उपलब्ध करून दिली होती तरीही अशी परिस्थिती का? हा प्रश्न आमच्या मनात आहे. विद्युत पुरवठ्याची मागणी आणि पुरवठा यांचा कुठेही ताळमेळ दिसत नाही. नागरिक अधिकाऱ्यांना विचारण्यास गेले असता त्यांना उडवाउडवीची उत्तरे अथवा जागेची अनुपलब्धता याची कारणे सांगितली जातात. यामुळे विद्यार्थ्यांचे, त्याचप्रमाणे व्यापाऱ्यांचे, उद्योग व्यवसाय वाल्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

सावेडी उपनगरातली विद्युत पुरवठा व्यवस्था ही लवकरात लवकर सुव्यवस्थित करण्यात यावी. त्यासाठी लागणारे सर्व प्रयत्न आपल्या स्तरावर होण्याबाबत संबंधितांना आदेश व्हावेत व सर्वतोपरी प्रयत्न व्हावेत, अशा आशयाचे निवेदन सावेडी मंडलाध्यक्ष सीए राजेंद्र काळे, शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, जिल्हा सरचिटणीस सचिन पारखी, मयुर ताठे, प्रशांत मुथ्था यांनी दिले आहे.

# महावितरणच्या कारभारात सुधारणा न झाल्यास तीव्र आंदोलन करणार

**महेंद्र गंधे यांचा कार्यकारी अभियंत्यांना निवेदनाद्वारे इशारा**



नगर - गेल्या काही दिवसांपासून सावेडी तसेच आसपासच्या भागात वारंवार लाईट जाण्याचे प्रमाण वाढत आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे किंवा केला जात आहे. तसेच मागील दोन तीन दिवसापासून अवकाळी पाऊस पडत असून, वाढत्या वादळी पावसामुळे तसेच फांद्या तुटून पडणे, जोराचा वारा येणे यांसारख्या अनेक कारणांमुळे वीज जाण्याचे प्रमाण वाढले आहे. सध्या वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. अनेक ठिकाणी वीजेवर चालणारे ऑक्सीजन कॉन्संट्रेटरचे मशीन सुरू आहेत, पण वीज खंडित झाल्यामुळे त्या देखील नागरिकांची गैरसोय होत आहे. तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी वर्गाशी दुरध्वनीद्वारे किंवा प्रत्यक्ष MSEB कार्यालयात नागरिकांद्वारे व लोकप्रतिनिधींद्वारे संपर्क साधला जात असता त्यांच्याकडून योग्य तो प्रतिसाद प्राप्त होत नाही. सतत लाईट जाण्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. तरी योग्य ती कारवाई करण्यात यावी.

आगामी काही दिवसात महावितरणच्या कारभारात सुधारणा झाली नाही तर मुख्य कार्यालय येथे मोठया स्वरूपात आंदोलन केले जाईल, असा इशारा महावितरणचे कार्यकारी अभियंता यांना निवेदनाद्वारे भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे यांनी दिला आहे.

## रोहन वंगा यांचे हृदयविकाराने निधन



नगर - शिवाजीनगर, कल्याणरोड येथील रहिवासी रोहन कुमार वंगा (वय २४) यांचे २० मे रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात आई, वडील, १ भाऊ असा परिवार आहे.

## राजेंद्र झिंजे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - प्रेमदान हडको येथील रहिवासी राजेंद्र मनोहर झिंजे (वय ५५) यांचे १७ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात ३ मुले, सुना, ३ भाऊ, भावजय असा परिवार आहे. नवीपेठ येथील मनोहर टेलर्सचे ते संचालक तर तोफखाना मित्रमंडळाचे ते सभासद होते.

## पिंपळगाव माळवीचे भाऊसाहेब गायकवाड यांचे निधन

नगर - नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथील भाऊसाहेब राजाराम गायकवाड (वय ६८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. गावातील अमरधाम येथे त्यांचा अंत्यविधी करण्यात आला.



त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, चार भाऊ, एक बहीण, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

गोरख गायकवाड व मच्छिंद्र गायकवाड यांचे ते वडील होते. नेप्ती येथील रामदास फुले व भानदास फुले यांचे ते मेहुणे होते.


## गौरव बोकन यांचे आकस्मिक निधन

श्रीरामपूर - येथील गौरव सुरेश बोकन (वय ३२) यांचे २० मे रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात आजी, आई, वडील, पत्नी, भाऊ, एक मुलगी, चुलते - चुलती, चुलत बंधू असा परिवार आहे. गौरव हे सुरेश गणपत बोकन यांचे चिरंजीव, कैलास बोकन यांचे पुतणे, गणेश बोकन यांचे बंधू, शुभम व विकास बोकन यांचे चुलत बंधू होत.



## लीलाधरभाई जेठवा यांचे अल्पशा आजाराने निधन

श्रीरामपूर - येथील जुन्या पिढीतील भुसार मालाचे व्यापारी लीलाधरभाई लालजीभाई जेठवा (वय ८७) यांचे १९ मे रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, एक मुलगा, दोन मुली, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



बेलापूर येथील श्री पॅकेजिंगचे मालक प्रकाश जेठवा व महेश जेठवा यांचे थोरले बंधू, नितीन जेठवा यांचे वडील, देवर्ष व चेतन जेठवा यांचे चुलते होत.

## अन्यथा मनपा युनियनचे 'बेमुदत धरणे आंदोलन'

(पान १ वरुन)

करून पात्र कर्मचाऱ्यांना बढती आणि कालबद्ध पदोन्नती देण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. आरोग्य विभागातील RCH व NUHM कर्मचाऱ्यांना वार्षिक वेतनवाढ देणे, तसेच महासभेच्या ठरावानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा प्रस्ताव शासनाकडे तात्काळ मंजुरीसाठी पाठवावा, अशीही मागणी कामगार युनियनच्या वतीने महापालिका आयुक्त यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

महापालिकेतील कर्मचाऱ्यांसाठी घरकुल योजना राबवावी, आणि ANM परिचारिकांना शासकीय नियमानुसार वेतनश्रेणी लागू करावी, अशीही ठाम भूमिका संघटनेने मांडली आहे. आम्ही आंदोलन करणे टाळू इच्छितो, पण प्रश्नांची सोडवणूक न झाल्यास बेमुदत धरणे आंदोलन अपरिहार्य ठरेल, असा स्पष्ट इशारा कामगार संघटनेचे आनंद वायकर यांनी दिला आहे.

# प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नगर शहरातच व्हावे : जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अहिल्यानगर डॉक्टर सोसायटीची मागणी**

नगर - अहिल्यानगर शहर येथे प्रस्तावित असलेले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अहिल्यानगर शहर परिसरातच व्हावे ही मागणी अहिल्यानगर डॉक्टर सोसायटीच्यावतीने करण्यात आली आहे, असे डॉ.सुदर्शन गोरे यांनी सांगितले.

Nagar Doctors Society
Social Responsible Health

सदर वैद्यकीय महाविद्यालय शिर्डी येथे करण्याबाबतचे ऐकिवात आहे परंतु तसे न करता मध्यवर्ती अशा अहिल्यानगर शहरासाठी अत्यावश्यक असलेली वैद्यकीय सेवा या महाविद्यालयामार्फत सर्वसामान्य व गरीब गरजू रुग्णांना भेटणार आहे.

कोविडच्या कालावधीमध्ये अहिल्यानगर शहराने होणारी वैद्यकीय हेळसांड अनुभवलेली आहे, तरी हे प्रस्तावित महाविद्यालय अहिल्यानगर शहरातच व्हावे ही मागणी प्रशासनास अहिल्यानगर डॉक्टर असोसिएशनच्या वतीने व सर्व वैद्यकीय संघटनामार्फत करण्यात येत आहे.

सदर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी पिंपळगाव माळवी येथील महानगरपालिकेचा भूखंड, चास येथील कृषी विभागाचा भूखंड, आरणगाव येथील जुने टीबी रुग्णालय, देहरे विळद येथील महापालिकेचे भूखंड असे भुखंड प्रस्तावित आहेत. तरी सदर पैकी कोणत्याही जागेवर हे महाविद्यालय व्हावे, अशी मागणी अहिल्यानगर डॉक्टर सोसायटीच्या वतीने करण्यात आली आहे, असे डॉ. सुदर्शन गोरे यांनी सांगितले.

# नगरमधील गावठाणातील रस्त्यांची झालेली दुर्दशा अणुबॉम्ब पडलेल्या हिरोशिमा शहरासारखी झालीयं

(पान १ वरुन)



डांबराचा पहिला शत्रू पाणी असतो आणि फक्त पाच मिनिट जरी पाऊस पडला तरी रस्त्यावर पाणीच पाणी कसे काय असते? रस्ता करतानाच कुठल्या बाजूला उतार द्यायचा? मॅन होल कुठे ठेवायचे? गटारीचे ओपनिंग कुठे ठेवायचे ? याची साधी अक्कल नसलेले ठेकेदार आणि अभियंते यांनी या शहराचे वाटोळे केलेले आहे.

सन्माननीय विद्वान आयुक्त तथा प्रशासक यांनी सरकारी पद्धतीने काल आपत्ती व्यवस्थापनाची बैठक घेतली आणि सर्वांना योग्य त्या सूचना केल्या, अशा विनोदी बातम्या छापून आलेल्या आहेत. शाळेत असताना भूगोल नीट न शिकल्यामुळे आपल्या भारतामध्ये दरवर्षी जूनमध्ये पावसाळा येतो, हे कदाचित माहीत नसेल म्हणून अशा बैठका आणि उपाययोजना मार्च, एप्रिल मे मध्ये घ्याव्यात, अशी सद्बुद्धी प्रशासनाला कधीच सुचत नाही.

मनपाने परवानगी दिलेली कुठलेही वेळापत्रक नसलेली कुठलंही नियोजन नसलेली वेगवेगळ्या मोबाईल नेटवर्कच्या केबलची खोदाई कामे, फेज टू ची कामे, व गटार योजना यांचे कुणाचेही एकमेकांशी समन्वय नसल्यामुळे. बऱ्याच ठिकाणी एकाचे काम झाल्याशिवाय दुसऱ्याला करता येत नाही. सर्वात हास्यास्पद गोष्ट म्हणजे पावसाळा तोंडावर असताना एकदम सगळेच रस्ते एकाच वेळी खोदून ठेवण्याचा पराक्रम फक्त आपल्याकडे तंबाखूछाप अधिकारी, पुढारी आणि ठेकेदार हे त्रिदेवच करू शकतात. साध्या आपल्या घराला दिवाळीत रंग द्यायचा असेल तर आपण एकदम सगळे घर रस्त्यावर आणून ठेवत नाही आणि घराला रंग द्यायचा आहे म्हणून एकदम सगळे रस्त्यावर बसून जेवण करत नाही. एक एक खोली प्रमाणे सोयी सोयीने सामान हलवून त्याचे रंग द्यायचे नियोजन करतो, एवढी पण रस्त्याच्या कामाची नियोजनाची अक्कल प्रशासनाला नसावी, हे किती दुर्दैव आहे.

सदर अजूनही काम सुरु न झालेले रस्ते नक्की होणार आहेत की नाही, आणि झाले तरी भर पावसाळ्यात कुठल्या दर्जाचे होणार? ते पुढील पावसाळ्यापर्यंत टिकणार की नाही. पुढील पावसाळ्यापूर्वी परत त्याच तिकिटावर तोच खेळ सुरू होणार आहे. अॅडव्हान्स पेमेंट काढण्यासाठी किंवा चेक काढण्यासाठी खालपासून वरपर्यंत टक्केवारीची पेरणी करावी लागते. वाढलेल्या किमतीनुसार किंमत वाढवून मिळत नाही, टक्केवारीसाठी आडून बसलेले टक्केवारी कमी करत नाहीत. अशावेळी ठेकेदाराने काम वेगाने कसे करायचे? हा देखील एक यक्ष प्रश्न आहे.

आई जेवायला देत नाही आणि बाप भीक मागू देत नाही, अशी एकंदर अवस्था आहे, याची सुज्ञ मतदारांनी नोंद घ्यावी व रस्त्यांची दुरावस्था जसून तशीच असल्याबद्दल केवळ आणि केवळ मनपा प्रशासनालाच जबाबदार धरू नये, म्हणजे आपल्याच वॉर्डातील रस्त्यांची कामे यापूर्वीच पावसाळा येण्यापूर्वीच का झाली नाही? याचा उलगडा होईल. त्यामध्ये आता मायबाप सरकारने चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जाहीर केल्या आहेत, त्यामुळे आजपर्यंत बिळात लपून बसलेले सगळे इच्छुक उंदिर उमेदवार बाहेर येऊ लागतील आणि विकास विकास विकास करू लागतील.

शहरांमध्ये असे एकही ठिकाण नाही, एकही गल्ली नाही, जिथे रस्ता अस्तित्वात आहे. दुसऱ्या महायुद्धात हिरोशिमा आणि नागासाकीवर अणुबॉम्ब टाकल्यानंतरसुद्धा त्या शहराची इतकी वाईट अवस्था झाली नव्हती, इतकी वाईट अवस्था सध्या शहराची आहे.

नगरची तुंबई होण्याची शक्यता अधिक आहे. भुयारी गटार योजनेचे तर अगोदरच तीन तेरा वाजलेले आहेत. फेज टू पाणी योजनेचे पाईप शहरांमध्ये जमिनीखाली कुठे कुठे गाडले आहेत, याची नकाशासह इत्यंभूत माहिती देणाऱ्याला जागरूक नागरिक मंचातर्फे १ लाख रुपयाचे बक्षीस दिले जाईल, असे आम्ही जाहीर करतो कारण फेज टू चा ठेकेदार पैसे घेऊन केव्हाच बेपत्ता झालेला आहे आणि त्या योजनेचे पुढे काय करायचे? याबाबत कोणालाच काहीच समजत नाही.

बहुतांश ठिकाणी ड्रेनेजचे मॅन होल तुटून आताच उघडे पडले आहेत, त्यामुळे सुंदर गटार कारंज्यांची आतषबाजी चौकाचौकात भरपावसात नगरकरांना पाहण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या सर्व पातळींवर या शहराचे आपत्ती व्यवस्थापनच एकंदर आपत्तीग्रस्त असल्याचे स्पष्ट होत आहे.

एकंदर इतिहास साक्षीदार आहे की, या ऐतिहासिक अहमदनगरमधील ऐतिहासिक नगरकर इतिहासात नोंद होईल इतके सहनशील आहेत. परंतु या वेळेस नगरकरांच्या सहनशीलतेचा अंत पाहिला जाणार की काय? असे चित्र आहे तरी आपण दिवस-रात्र काम करून येणाऱ्या धोक्याची तीव्रता कमी करावी. ठेकेदारांचे वरील प्रश्न सोडवून त्यांना तातडीने अखंड दिवस रात्र काम सुरू ठेवण्याचे आदेश द्यावेत व अनेक ठिकाणचे तुटलेले ड्रेनेजचे सर्व मॅन होल कव्हर व नालेसफाई याची आपत्ती उद्भवण्या पूर्वी आपत्ती व्यवस्थापन करावे, ही अपेक्षा. अन्यथा या नांगरलेल्या रस्त्याच्या जीवघेण्या खड्ड्यांमुळे, मॅन होलमुळे व साचलेल्या चिखल पाण्यामुळे नागरिकांच्या जीविताला धोका झाल्यास नाईलाजास्तव संबंधितांवर ठेकेदारापासून वरीष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून आंदोलन करण्याची वेळ येईल, असा इशारा जागरुक नागरिक मंचचे अध्यक्ष सुहासभाई मुळे यांनी दिला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### दररोज करा जिभ स्वच्छ...

तोंडाच्या आरोग्यामध्ये एका महत्त्वाच्या अवयवाची स्वच्छता ही अत्यंत आवश्यक ठरते. तो अवयव म्हणजे आपली जीभ. कारण, तुमची जीभ स्वच्छ केल्याने तुमच्या तोंडाच्या आणि एकूण आरोग्यासाठी अनेक फायदे मिळू शकतात. जिभेवर अनेक प्रकारचे जीवाणू, अन्नाचे कण आणि मृत पेशी असतात ज्या श्वासाची दुर्गंधी आणि दात किडण्यास कारणीभूत ठरतात. तुमची जीभ स्वच्छ केल्याने हे बॅक्टेरिया काढून टाकण्यात नक्कीच मदत होते. तसेच तुमच्या संपूर्ण तोंडाची स्वच्छता सुधारण्यास मदत होऊ शकते. यामुळे आपली चवीची संवेदना अधिक सुधारू शकते. तोंडाचा वास येणे टाळले जाऊ शकते तसेच हिरड्यांच्या रोगाचा धोका कमी होऊ शकतो. एकंदरीत, तुमची जीभ स्वच्छ करणे तुमच्या शरीरासाठी आवश्यक नसले तरी ते तुमच्या तोंडाच्या आणि एकूण आरोग्यासाठी अनेक फायदे देऊ शकते.

## पाककला

### थंडाई प्रिमीक्स

**साहित्य :** २५ ग्राम बदाम, २५ ग्राम काजु, २५ ग्राम पिस्ता, २५ ग्राम खाकस, २५ ग्राम मगजबी, ५-६ मिरेपूड, २ इंच कलमी, ३-४ विलायचीची पुड, बडीशेप पावडर, गुलाबाच्या पाकळ्या, गुलकंद आवडीनुसार,

**कृती :** आधी सर्व डायफ्रुड समप्रमाणात काढून घ्यावेत. नंतर सर्व ड्रायफ्रुड, गुलाबाच्या पाकळ्या पण परतुन कढईत मंद आचेवर भाजून घ्यावेत. नंतर ड्रायफ्रुटस् थंड झाल्यावर कलमीपुड, विलायची पुड, बडीशेप पावडर घालून मिक्सरमधून बारीक करून घ्यावे. नंतर थंडाई प्रिमिक्स तयार झाल्यावर साखर घालून दुध गरम करून थंड झाल्यावर थंडाई प्रिमिक्स टाकून थंडाई तयार करावी.

## वास्तू

### धनवृद्धी व पैश्यासंबंधी

❊ उत्तर दिशा भगवान कुबेरचे वर्चस्व मानले जाते आणि पूर्व दिशा भगवान इंद्राचे वर्चस्व मानली जाते. या दोन्ही दिशेला तिजोरीचे तोंड उघडल्याने धनवृद्धी होईल. असे केल्याने तुमच्या कुटुंबातही आनंदाचे वातावरण राहील. तिजोरी कधीही दक्षिणेकडे तोंड करू नये.

❊ भिंतीला लागून शौचालय किंवा स्नानगृह असलेल्या ठिकाणी जर तुम्ही पैसे ठेवत असाल तर हे देखील चुकीचे आहे. त्यामुळे पैसा हातात राहणे थांबते.

❊ तिजोरीत उत्तर दिशेला छोटा आरसा लावल्यास धनवृद्धी होते.

## सल्ला

रेफ्रिजरेटरच्या ड्रॉवर, ट्रे आणि ड्रायर स्वच्छ करण्यासाठी कोमट पाण्यात थोडे द्रव डिटर्जंट मिसळून द्रावण तयार करा. या द्रावणात स्वच्छ कापड भिजवून रेफ्रिजरेटरचे सर्व भाग काळजीपूर्वक स्वच्छ करा. ही पद्धत रसायनांचा वापर न करता तुमचा फ्रिज स्वच्छ ठेवण्यासाठी उत्तम आहे.

## सौंदर्य

मक्याच्या पीठात साखर आणि अंडे एकत्र करा. त्याची पेस्ट चेहरा आणि हातांवर लावा. थोडा वेळ ठेऊन ही पेस्ट धुवून टाका. त्यामुळे चेहरा आणि हातावरचेही केस निघून जाण्यास मदत होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २१ मे २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, शततारा १८।५८, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा. आपल्या व्यवहारांमध्ये सावधगिरी बाळगा. आर्थिक चणचण जाणवेल.

**वृषभ :** व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. दिवस अनुकूल व महत्वाचा असेल. आपले अडकेलेले कार्ये पूर्ण होतील.

**मिथुन :** काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. राजकारण्यांना स्वत:चा प्रचार करण्यासाठी चांगला दिवस.

**कर्क :** आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल. आनंदाची बातमी मिळेल. विशिष्ट कार्य पूर्ण होतील. महत्वपूर्ण व्यक्तींशी संपर्क फायद्याचे राहतील.

**सिंह :** कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही. राजकीय व्यक्तींसाठी देखील स्थिती सुखदायक राहील. एखादे काम न झाल्यामुळे अप्रसन्न राहाल.

**कन्या :** मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल.

**तूळ :** आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयरसंदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता. नोकरदार व्यक्तींसाठी अनुकूलता.

**वृश्चिक :** आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु संयम न ठेवल्याने अडचणी निर्माण होतील.

**धनु :** रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. आर्थिक लाभ होईल. भाऊबंद डोके वर काढतील मात्र चातुर्याने त्यांच्यावर मात कराल.

**मकर :** शत्रूवर्ग निष्प्रभावी राहील. श्रम अधिक झाल्यामुळे दमल्यासारखे वाटेल. वाहने बिघडण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** विश्रांतीसाठी किंचित वेळ द्याल. मित्रांचा सहयोग मिळेल. सामाजिक प्रतिष्ठा मानसन्मान वाढेल.

**मीन :** मुले त्रास देऊ शकतात. अनावश्यक चिंता सतावतील. तरुणांसाठी मुलाखतीसाठी शुभ दिवस राहिल. विवाहेच्छूकांचेही विवाह जमतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७१८१

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ५ | | ६ |
| ७ | | | ■ | ८ | | ■ | |
| | ■ | ९ | १० | | ■ | ११ | |
| १२ | १३ | ■ | | ■ | १४ | | ■ |
| १५ | | १६ | | ■ | १७ | | १८ |
| ■ | १९ | | ■ | २० | ■ | ■ | |
| २१ | | | ■ | २२ | | २३ | |
| २४ | | ■ | २५ | | ■ | २६ | |

**आडवे शब्द :-** १) उलगडा; खुलासा ४) पंच; पंचांमार्फत चौकशी ७) पदार्थाचा उडालेला तुकडा ८) हलणारे; विनाशी ९) एक क्षुद्र जीव; किडा ११) दिक्; बाजू; डायरेक्शन १२) हळू; सावकाश; धिमा; संथ १४) वस्तुमात्राचे संबोधन; नाम; होडी; जहाज १५) भित्रा; घाबरट १७) कडक पाठ असलेला एक जलचर १९) पोस्ट; मेल; टपाल २१) महाराष्ट्राच्या पश्चिमेकडील हद्दीचा व सह्याद्री पर्वताच्या पूर्वेकडचा प्रदेश ज्याचे बारा भाग आहे २२) कावळ्याचे ओरडणे २४) राजाची बायको; क्वीन २५) एक प्रकारचे गवत २६) मृत्यू; मृत्युदेव

**उभे शब्द :-** १) दक्षिण भारतातील एक थंड हवेचे ठिकाण २) मिठी; आलिंगन ३) चकाकी; चमक ४) पाचांचा समुदाय ५) चालण्याची ढब; पद्धत; वर्तणूक ६) निर्लज्जपणाचे वर्तन; एक लोककला १०) कडक; निबर ११) दिन; दीस; वासर १३) धमकी; दम १४) जकात वसुलीचे ठिकाण १६) भरीव नसलेला; रिता; रिकामा १८) अळ्या वगैरेंची एकाच जागी होणारी एकसारखी हालचाल २०) सूर्योदयानंतरचा कोवळ्या उन्हाचा कालावधी २१) वृष्टी; वर्षाव २३) वडिलांचा भाऊ; चुलता

### शब्दगंध क्र. ७१८० चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सं | ज | य | ■ | सा | म | जू | त |
| सा | प | ढा | य | क | ■ | म | ळ |
| प | ■ | क | म | ळ | ■ | ■ | त |
| ■ | धं | दा | ■ | ■ | स | म | ळा |
| का | ■ | भि | ना | ब | ■ | ■ | ट |
| म | द | त | नी | स | ■ | म | ■ |
| गा | र | ■ | ■ | क | मा | व | ता |
| र | ड | ■ | त | र | त | री | त |

# ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ मुलांचे विश्व ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** वडीलांनी कमावलेले सर्व काही वाढवायला हवे मग ते धन असो किंवा सन्मान असो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### 'कॉपी पेस्ट'चा शोध कोणी लावला?

आपल्या रोजच्या जीवनात, कामाच्या ठिकाणी सर्रास वापरण्यात येणारा कॉम्प्युटर अतिशय महत्त्वाची बाब आहे. विचार करा कॉम्प्युटरमध्ये कट, कॉपी, पेस्ट या शॉर्टकट सुविधा नसत्या तर? Ctrl+C, Ctrl+V आणि Ctrl+X या तीन शॉर्टकटमुळे मोठी कामेही आज अगदी सहजपणे पूर्ण करता येत आहेत. कॉम्प्युटरमधल्या या सुविधेचे जनक, कॉम्प्युटर संशोधक लॅरी टेस्लर आहेत.

लॅरी टेस्लर यांचा जन्म १९४५ मध्ये न्यूयॉर्कच्या ब्रॉक्समध्ये झाला होता. त्यांनी कॅलिफोर्नियातील स्टेनफोर्ड यूनिव्हर्सिटीमधून शिक्षण घेतले. १९७३ मध्ये ते Xerox मध्ये भरती झाले. तिथेच त्यांनी टिम मॉटसह मिळून, जिप्सी टेक्स्ट एडिटर तयार केला. त्यातच त्यांनी कंटेंट कॉपी आणि एका जागेवरुन दुसऱ्या जागी मूव्ह करण्यासाठी मोडलेस पद्धत तयार केली. त्यातूनच कट, कॉपी आणि पेस्टची संकल्पना आली.

Xerox Palo lto Research Centerer (PRC)

अनेक वर्ष जोडल्यानंतर स्टीव जॉब्स, त्यांना Apple मध्ये घेऊन आले. तेथे त्यांनी १७ वर्ष काम केले. Apple सोडल्यानंतर त्यांनी एक एज्युकेशन स्टार्ट अप सुरु केले. यादरम्यान ते काही काळ अमेझॉन आणि याहूसोबतही जोडले गेले होते. या अतुलनीय सृजनासह वाचविलेल्या वेळ आणि बोटाच्या उर्जेसाठी. कट / कॉपी आणि पेस्टचा शोध लावणारा म्हणून इतिहासातील क्रेडिट केलेल्या संगणकाच्या शास्त्रज्ञ लॅरी टेस्लरचे आभार मानावे लागतील.

### हयग्रीव अवतार


हयग्रीव म्हणजे घोड्याचे मस्तक. नृसिंहावतारात भगवंतांनी हिरण्यकश्यपूचा नाश केला, अशी कथा आहे. हयग्रीवावताराची ही कथा वैशंपायन ऋषींनी राजा जनमेजयाला सांगितली ती अशी -

भगवंतानी नुकतीच सृष्टी निर्माण केली होती. त्यानंतर लगेचच अगस्ती ऋषींना एक मोठा यज्ञ करावा असे वाटू लागले. त्यांनी सर्व ऋषींना एकत्र बोलावले. सर्वांनी मिळून यज्ञासाठी लागणारे हत्ती, उंट वगैरे प्राणी तसेच इतर सामग्री गोळा केली. पूर्णाहुती देण्यासाठी त्यांनी घोड्याचे मस्तक कापून बाजूला ठेवले. यज्ञाचे दुष्ट शक्तींपासून रक्षण करण्यासाठी ऋषींनी भगवंताकडे मदतीची याचना केली. ऋषींच्या विनंतीला मान देऊन भगवंत धनुष्यबाण घेऊन आले व यज्ञमंडपाच्या दाराशी उभे राहून रक्षण करू लागले. तेव्हा त्यांच्या मनात विचार आले, आज माझ्यामुळे ऋषी निश्चिंतपणे यज्ञ करू शकतात. त्यांच्या तीर्थयात्रा, व्रत, तप, इतर कर्मकांडे माझ्या इच्छेनुसार चालतात. एवढेच नव्हे तर सृष्टीची निर्मिती, सर्व प्राणिमात्रांची निर्मिती माझ्यामुळे झाली. अशा विचारांनी भगवंत स्वतःलाच धन्य मानू लागले. पण या अहंकारी विचारांच्या तंद्रीत त्यांच्या धनुष्याच्या दोरीचा झटका लागून भगवंताचे शिर तुटले व ते आकाशात उडू लागले. त्यापासूनच नभोमंडळात सूर्याची निर्मिती झाली.

ऋषींचे जेव्हा भगवंताकडे लक्ष गेले तेव्हा त्यांचे मस्तक धडावेगळे झाल्याचे पाहून ते आश्चर्यचकित व दुःखी झाले. कोणा दुष्ट राक्षसाने हे काम केले असावे असे त्यांना वाटले. यज्ञाच्या पूर्णाहुतीसाठी बाजूला काढून ठेवलेले घोड्याचे मस्तक त्यांनी भगवंतांच्या शरीरावर बसवले. अशा प्रकारे हयग्रीवावतार झाला.

भगवंत ऋषींना म्हणाले, गर्व हा नेहमीच नाशक असतो. माझ्या मनात गर्व उत्पन्न झाल्यामुळे त्या आदिशक्तीने मला ही शिक्षा दिली. आता माझ्याच शिरापासून आकाशात सूर्य निर्माण झाला आहे. तो अत्यंत तेजस्वी असून त्याला माझा म्हणजे नारायणाचा अंश समजून तुम्ही त्याची भक्ती करा.

## रहमते दर्शन (भाग - १)



### महाराज जी की दयालुता

सन् १९७६ में मैं एक बार दर्शनसिंह जी से मिला, तो उन्होंने मुझसे मेरी नौकरी के बारे में जानना चाहा। मैंने उत्तर दिया, महाराज जी मैं बेरोज़गार हूँ और जब तक आप दया - मेहर नहीं करेंगे, मुझे नौकरी नहीं मिल सकती। उस दिन महाराज जी काफी दयावान थे और मुझे किसी नौकरी के लिए अर्जी देने को कहा और साथ ही आदेश दिया कि अर्ज़ी देने के पश्चात मैं उन्हें सूचित करूँ ।

मैंने एक सरकारी महकमे में नौकरी के लिए आवेदन दे दिया। समय आने पर मेरा साक्षात्कार हुआ, परन्तु मैं उसमें फेल हो गया । जो लड़के मुझसे भी कम पढ़े-लिखे थे, उन्हें नौकरी पर रख लिया गया। यह सब बातें मैंने महाराज जी को बता दीं और कहा कि अब भविष्य में मैं किसी परीक्षा में नहीं बैठूंगा। महाराज जी ने गम्भीर होकर परन्तु दया-मेहर की दृष्टि मुझ पर डालते हुए कहा, मेरे कहने से इस बार तुम परीक्षा में अंतिम बार बैठ जाओ, भविष्य में मैं कभी तुम्हें परीक्षा देने के लिए नहीं कहूँगा। महाराज जी के आदेशानुसार अगली बार फिर नौकरी के लिए आवेदन दिया। परीक्षा हुई और इस बार पेपर इतने सरल थे कि मैंने बड़ी आसानी से सभी पेपर कर डाले और परीक्षा में उत्तीर्ण हो गया।

अंततः २८ अप्रैल १९७७ को मैंने सरकारी नौकरी पर जाना शुरू कर दिया। पहले महीने का वेतन मिलने पर, मैंने कुछ पैसे सेवा में जमा कर दिये और बाक़ी लेकर महाराज जी के पास जा पहुँचा। मेरी पहली कमाई मेरे हाथ में देखकर महाराज जी ने मुझसे बाक़ी पैसों के बारे में जानना चाहा, हालाँकि वे खुद जानते थे कि मैंने वे पैसे सेवा में जमा कर दिये हैं। मेरे चुप रहने पर महाराज जी ने आशीर्वाद देते हुए कहा कि जब कभी भी किसी परीक्षा में बैठो, मुझे ज़रूर बताना । इसके पश्चात मैं जिस किसी भी परीक्षा में बैठा, सब में उत्तीर्ण होता चला गया। मैं पूरे दावे के साथ कहना चाहता हूँ कि जो भी महाराज जी के पास गया, उन्होंने उसकी झोली अपने प्यार से भर दी । उनका दरवाज़ा हमेशा सब के लिए खुला था ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### विशुद्ध ऊर्जा चक्र

आकाश में ईथर नाम का तत्व है जो ध्वनि का सुचालक है, जिस कारण हम अपना संदेश विश्व के किसी भी कोने में भेज सकते हैं। आकाश में ही एक स्थान है जहां रोकेट आदि बिना किसी बाहरी ऊर्जा के घूमते रहते हैं। इस स्थान को स्पेस कहते हैं। इसी स्पेस के कारण आज का विज्ञान बहुत उन्नति कर पाया है। बहुत सारी गैसीज जो मानवता के लिये जरूरी हैं वह आकाश से ही प्राप्त होती हैं। जब बच्चे पूर्वजों के बारे पूछते हैं तो हम आकाश में सितारे दिखाते हैं कि वह वहां हैं। जब कभी हमारे नजदीकी की मृत्यु होती है तो हम कहते हैं कि वह आकाश पर भगवान के पास चला गया है। सार में कहे तो सारा संसार ही आकाश के कारण है। इसी कारण सभी लोग ऊपर की ओर इशारा करते रहते हैं। इसके इलावा गहरा कारण यह है कि जो वस्तु जिस चीज से बनी होती है वह उसी की ओर खींचती चली जाती है। अग्नि ऊपर की ओर उठती है क्योंकि सूर्य ऊपर है और अग्नि सूर्य का ही रुप है। पानी नीचे की ओर बहता है क्योंकि वह समुन्द्र में मिलना चाहता है। ऐसे ही आत्मा परमात्मा की संतान होने के कारण आकाश की ओर देखती है क्योंकि भगवान परमधाम निवासी है। जिनका योग नहीं लगता वह अगर मन से नीला आकाश देखते रहें तो योग लगने लगेगा। क्योंकि ऐसे देखने मात्र से मन की एनर्जी ऊपर उठ जाती है जैसे हम योग में करते हैं और सहज ही अनुभव होने लगता है। जो लोग भगवान को याद नहीं करते वह दिन में हर घंटे बाद या जब जब कोई भी रुकावट आए वह ऊपर मुंह कर के आकाश की तरफ देखें और कहे आप की प्रेरणा क्या है। देखना आप हर समस्या पर विजयी होंगे।

आकाश -३

आकाश तत्व निराकार है। परंतु सत्य है। इस तत्व का कभी नाश नहीं होता। ऐसे ही भगवान भी निराकार है परंतु सत्य है और अमर

है। आकाश एक बड़ा शून्य है। ऐसे ही भगवान भी शून्य है। भगवान भी एक तत्व है जो कि आकाश से भी सूक्ष्म है। हम आकाश तत्व का सेवन कर के अमर बन सकते हैं, शारीरिक, मानसिक और अध्यात्मिक स्वास्थ्य प्राप्त कर सकते हैं। शरीर के अन्दर आकाश तत्व के खास स्थान हैं सिर, गला, दिल, पेट और कमर । जिस तरह आकाश हमारे आस पास, ऊपर नीचे है इसी तरह वह हमारे अन्दर भी है। चमड़ी के छेदो में या जहां खाली स्थान है वहां आकाश है। आकाश तत्व आरोग्य सम्राट है। आकाश में सूक्ष्म चुम्बकीय तथा विद्युत शक्ति और आक्सीजन के इलावा पेड़ पौधों की सूक्ष्म सुगंध रहती है जो हमारे शरीर को शक्तिशाली और निरोगी बनाती रहती है। यही कारण है खेतों व जंगलों में रहने वाले जीव और मनुष्य तंदरुस्त रहते हैं। तंग जगह पर रहने वाले लोग बीमार रहते हैं। अगर हम भोजन कुछ कम करेगें तो पेट में जो खाली जगह बचेगी वह आकाश तत्व से भर जायेगी। अगर हम हफ्ते में एक दिन उपवास करें या दिन में सिर्फ एक बार भोजन करें तो खाली जगह आकाश तत्व से भर जायेगी और वह अन्न की पूर्ति करेगा।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

गुरुजी : बंडू खरे खरे सांग नाही
तर चड्डी काढून मारेन तुला...
बंडू : पण सगळी चूक माझी आहे,
तुम्ही का चड्डी काढताय

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❊ बांग्लादेशला कोणत्या वर्षी स्वातंत्र्य मिळाले?

- २६ मार्च १९७१

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### डॉक्टर, मला बाळ हवंय!

विशुद्ध चक्र या कंठ चक्र आकाश तत्व का प्रतीक है। आकाश में जो कुछ घट रहा है यह चक्र उस से प्रभावित होता रहता है। आकाश एक तत्व है। यह बहुत सूक्ष्म है। यह किसी भी चीज में रुकावट नहीं डालता। इस में हम जो चाहें जैसे चाहें निर्माण कर सकते हैं। साधारण भाषा में आकाश अर्थात् खाली स्थान ही आकाश है। धरती से ले कर आसमान तक जहां भी खाली स्थान है वह सब आकाश है। यह अनंत है। इस संसार की हर वस्तु, हर घटना, सूर्य प्रकाश या कहे जो कुछ दिखता है या अदृश्य है वह सब इस आकाश तत्व के अन्दर ही है।

हमारा शरीर जल, पृथ्वी, वायु, अग्नि वा आकाश तत्वों के एक निश्चित अनुपात से मिल कर बना है। हम अपने अन्दर घटित होने वाली चीजो के इलावा कुछ नहीं देख सकते। हम पृथ्वी पर बैठे हैं जो कि घूम रही है और हमें पता नहीं चलता कि वह घूम रही है। पृथ्वी अपनी जगह पर इसलिये है क्योंकि आकाश इस पृथ्वी, सूर्य तथा सौर मंडल, अकाश गंगा और पूरे ब्रह्मांड को अपनी ओर खींच रहा है। अगर हम जान जायें कि आकाश तत्व का सहयोग कैसे लेना है तो जीवन धन्य धन्य हो जायेगा। अगर आकाश तत्व से मदद मनुष्य मिलती है तो अद्भुत परिवर्तन आयेगा। अगर हमें कोई उपलब्धि मिलती है तो ऊपर आकाश की ओर देखते हैं और कहते हैं ऊपर वाले की दया से यह हुआ है। जब लाचार होते हैं तब भी ऊपर की ओर इशारा करते हैं, हे नीली छतरी वाले तेरा ही साहारा है। तू ही तू मेहर कर । जब कोई हमें नमस्कार करता है तो हम ऊपर की ओर उंगली करते हुये कहते हैं ऊपर वाले को नमस्कार। जब कोई खास लक्ष्य रखते हैं तो ऊपर वाले की मदद मांगते हैं। आप की मदद से ही अमुक काम अच्छा होगा। यह जो हम ऊपर वाले की मदद मांगते हैं इस के पीछे भी गहरा राज है।

सभी मनुष्य जाने अनजाने कभी न कभी आकाश की ओर उंगली करते हैं और कहते हैं यह ऊपर वाले की मेहरबानी है। वास्तव में हमारा अस्तित्व ही आकाश के कारण है। आकाश से हमें धूप मिलती है। धूप से हमें विटामिन और ऊर्जा मिलती है। अगर सूरज न निकले तो सारा संसार बर्फ बन जायेगा। आकाश से हमें हवा मिलती है। हवा से आक्सीजन मिलती है। जिस के बगैर हम जिंदा नहीं रह सकते।

आकाश से हमें बरसात के रुप में पानी मिलता है। हमारे शरीर में ७०% पानी है। अतः हम पानी के बिना भी नहीं रह सकते। आकाश से हमें फसलें और पेड़ पौधे मिलते हैं। पौधों और पेड़ों से हमें भोजन मिलता है। भोजन जीवन की पहली जरूरत है। इसलिये हम फसलें आदि उगाते हैं। इनके लिये पानी हवा और धूप तीनों जरूरी हैं। जो कि हमें आकाश से मिलते हैं। हमें आकाश से जीवनी विद्युत प्राप्त होती है जिसे प्राण कहते हैं। यह तत्व आक्सीजन के अन्दर होता है जो कि आकाश वा भगवान से हमें प्राप्त होता है।

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# भविष्य निर्वाह निधी संदर्भातील पावत्या मार्च २०२४ अखेरपर्यंत उपलब्ध न झाल्याने महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने तीव्र नाराजी

## विशेष कॅम्पद्वारे पावत्या वितरणाची मागणी, तोडगा निघाला नाही, तर आंदोलनाचा आक्रमक पवित्रा

नगर – जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी (पीएफ) संदर्भातील पावत्या मार्च २०२४ अखेरपर्यंत अद्याप उपलब्ध न झाल्याने महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सदर पावत्या तात्काळ ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने देण्यात याव्यात, यासाठी विशेष कॅम्प आयोजित करण्याची मागणी परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.



भविष्य निर्वाह निधी संदर्भातील पावत्या ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने देण्यात याव्या, या मागणीसाठी बाबासाहेब बोडखे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने माध्यमिक शिक्षण विभागाच्या वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के यांची भेट घेऊन निवेदन दिले.

तसेच कर्मचाऱ्यांचे पीएफ खाते विशेष कॅम्पच्या माध्यमातून ऑनलाईन अपडेटही करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतर आजतागायत कुठल्याही कर्मचाऱ्याला पुढील पावत्या मिळालेल्या नाहीत. त्यामुळे कर्मचारी आपल्या पीएफ खात्यातून कर्ज काढू इच्छित असताना, केवळ २०२१–२२ पर्यंतच शिल्लक रकमेवर आधारित कर्ज मंजूर केले जात आहे. परिणामी, पुढील दोन वर्षांचा हिशोब न धरल्याने कर्मचारी आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडले आहेत. फक्त पावत्याच नव्हे तर, जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रकारच्या पुरवणी देयकांचा, वैद्यकीय खर्चाच्या देयकांचा तसेच सेवानिवृत्त मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रजारोखीरकरणाच्या देयकांचा विलंबाच्या प्रश्नावर शिक्षक परिषदेने लक्ष वेधले. ही सर्व देयके तातडीने वितरित करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

या मागणीसाठी शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने माध्यमिक शिक्षण विभागाच्या वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी कोषाध्यक्ष प्रसाद सामलेटी, प्राचार्य संभाजी पवार, एस.एल. शिरसाठ, सुदाम दळवी, अभिजीत गवारे, बाळू दुधाडे, सुजय सजलानी, बापू दुधाडे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के यांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देत लवकरच उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन दिले. मात्र, जर अद्यापही तोडगा निघाला नाही, तर शिक्षक परिषद आंदोलनाचा आक्रमक पवित्रा घेइल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

जिल्ह्यातील शाळांना २०२१–२०२२ पर्यंतच्या भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या प्राप्त झाल्या आहेत.



ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. रामदास सूर्यवंशी यांना स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# छत्रपती संभाजी महाराज समाजरत्न पुरस्काराने अहिल्यानगरचे ॲड. रामदास सूर्यवंशी सन्मानित

नगर – ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. रामदास सूर्यवंशी यांना छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. निमगाव वाघा (ता.नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या गौरव सोहळ्याचे प्रमुख पाहुणे खासदार निलेश लंके यांच्या हस्ते ॲड. सूर्यवंशी यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी संमेलनाच्या अध्यक्षा सरोज आल्हाट, साहित्यिक भारत सातपुते, संमेलनाचे संयोजक व ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, कवी संमेलनाचे अध्यक्ष रज्ञाक शेख, गीताराम नरवडे, साहेबराव बोडखे, बाळासाहेब देशमुख आदी उपस्थित होते.

ॲड. रामदास सूर्यवंशी हे जिल्हा न्यायालय तसेच उच्च न्यायालयात गेल्या अनेक वर्षांपासून विधीज्ञ क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या वकिलीच्या माध्यमातून सर्वसामान्य आणि गरजू लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत. विशेषतः गरीब, वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांसाठी ते विनामोबदला सेवा देत असून, त्यांच्या न्यायहक्कासाठी लढा देत आहेत.त्यांच्या या निस्वार्थ कार्याबद्दल त्यांना छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

# ७० ते ९० च्या दशकातील सुरेल गीतांची २२ मे रोजी अहिल्यानगरमध्ये महफिल



नगर – ॲड. अमीन धाराणी प्रस्तुत गाता रहे मेरा दिल व स्वरछंद ग्रुपच्या वतीने ७० ते ९० च्या दशकातील सुमधुर गीतांची महफीलचे २२ मे रोजी संध्याकाळी ६ वाजता सावेडी येथील माऊली सभागृहात आयोजन करण्यात आले असल्याचे ॲड.अमीन धारणी यांनी सांगितले.

या महफीलीत संजय भिंगारदिवे, ॲड. गुलशन धाराणी, राजकुमार सहदेव, दीपा भालेराव, हेमंत नरसाळे, डॉ. सुरेखा घोडके, चंदर ललवाणी, ज्योती भिंगारदिवे, अर्जुन चौरे, मंदाकिनी पाडगावकर, वंदना जंगम, सोनवणे जी, नीता गडाख, मोनाली बोरुडे, माधुरी सोनटक्के, अंतरकर काका हे गीते सादर करतील तर सुरवातीला अमीत बरवा हे सेक्सोफोन वर गीत सादर करणार आहे. सुत्रसंचालन विजय माळी व सौ. दिपा माळी करणार आहे. सिस्टीम व तांत्रिक सहाय व्यवस्था विजु भोसले व अभिजित कोल्हार यांचे असल्याचे राजकुमार गुरनानी यांनी सांगितले.

या कार्यक्रमात शहरातील काही सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान केला जाणार आहे. कार्यक्रमाच्या अगोदर रिफ्रेशमेंटची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्वांना मोफत प्रवेश असून कार्यक्रम वेळ सुरू होईल. रसिकांनी वेळेवर उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन सौ. संध्या मेढे यांनी केले आहे.

# १५ मार्च २०२५ रोजीच्या संच मान्यतेला जैसे थे ठेवण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

नगर – शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये संच मान्यतेमुळे अनेक शाळांमध्ये शिक्षकांची संख्या शून्यावर गेल्याने संबंधित शिक्षक अतिरिक्त झाले होते. या शिक्षकांनी औरंगाबाद खंडपीठात दाखल केलेल्या याचिकेवर उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला असून, १५ मार्च २०२५ च्या संच मान्यतेला जैसे थे ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे संबंधित शिक्षकांना त्यांच्या मूळ शाळांमध्येच काम करण्याची परवानगी मिळाली असून, कोणतीही शाळा बंद होणार नाही, हा मोठा दिलासा मिळाला आहे.



१५ मार्च २०२५ च्या संच मान्यतेला जैसे थे ठेवण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश या आदेशानुसार कोणत्याही शिक्षकांना अतिरित्त करु नये, या मागणीचे निवदेन शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांना देताना प्राचार्य सुनील पंडित, आप्पासाहेब शिंदे, बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे आदी.

याचिकाकर्त्या शिक्षकांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ अरविंद गोपाळराव आंबेटकर यांनी काम पाहिले. दरम्यान, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाच्या वतीने अ.नगर येथील शिक्षक भवनामध्ये विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत विविध शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाचे उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित म्हणाले, शिक्षक हे राष्ट्रनिर्माते असतात. प्रशासनाच्या चुकीच्या निर्णयामुळे जर त्यांच्यावर अन्याय होत असेल, तर तो थांबवण्याची जबाबदारी संघटनेची आहे. कोणत्याही शिक्षकावर अन्याय होऊ देणार नाही, यासाठी संघटना सदैव कटिबद्ध आहे. आम्ही शाळा वाचवल्या आहेत, आता शिक्षकांचे हक्कही वाचवणार. त्यांनी यावेळी सर्व शिक्षकांनी एकजूट राहून संघटनेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन केले.

बैठकीला माध्यमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष व चेअरमन आप्पासाहेब शिंदे, शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष व सोसायटीचे संचालक बाबासाहेब बोडखे, सोसायटीचे संचालक महेंद्र हिंगे यांचीही उपस्थिती होती.



भारत माता की जय च्या जयघोषात भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ तिरंगा रॅली नगर शहरातून काढण्यात आली. (छाया – उदय जोशी)

# भारत माता की जयच्या जयघोषात भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ अहिल्यानगर शहरात तिरंगा रॅली, ठिकठिकाणी स्वागत व पुष्पवृटी

नगर – ऑपरेशन सिंदूर या नावाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय सैन्याने पाकिस्तानमधील अतिरेक्यांच्या तळावर एअर स्ट्राइक करून ९ तळ उद्ध्वस्त केले. भारतीय सैन्याचे अभिनंदन करणे हे प्रत्येक भारतीयाचे प्रथम कर्तव्यच आहे म्हणूनच अहिल्यानगरकरांच्या मनात देशाबद्दल व सैन्याबद्दल असलेली भावना आणखीन दृढ करण्यासाठी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मेजर विनोदसिंह परदेशी, पूर्व नवसैना अधिकारी अनिल जोशी, पूर्व नवसैना अधिकारी राहुल जाधव, नवसैना अधिकारी संजय पाटेकर, मेजर निळकंठ उल्हारे, मेजर गोरख पालवे, मेजर शिवाजी पालवे, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, संभाजी कदम, अशोक चौधरी, डॉ. दामोदर कळमकर, संजय म्हस्के, जालिंदर वाळके, शरद कामोटे, वस्ताद आंधळे, सी ए प्रसाद पुराणिक, सावेडी मंडल अध्यक्ष सी ए राजेंद्र काळे, हिंदू राष्ट्र सेनेचे संजय आडोळे, वसंत लोढा, सुनिल रामदासी, महेंद्र गंधे, दामोदर बठेजा, सचिन पारखी, प्रशांत मुथा, धनंजय जाधव, पंडित वाघमारे, गोपाल वर्मा, महेश गुगळे, संजय ढोणे, बाबासाहेब सानप, बाबासाहेब वाकळे, अनिल बोरुडे, सचिन जाधव, अनिल शिंदे, सौ. सुरेखा कदम, सौ. शिलाताई शिंदे, सौ. गीतांजली काळे, सौ. प्रिया जानवे, सौ. सुरेखा विद्ये, मयुर बोचुघोळ, करण कराळे, संपत नलावडे, कैलास गर्जे, करण डापसे, बाळासाहेब भुजबळ, सचिन जाधव भिंगार, भरत ठुबे, शाम नळकांडे, सचिन शिंदे, काका शेळके, ज्ञानेश्वर काळे, कालिंदी केसकर, सौ. सविता कोटा, करण कराळे, ओंकार लेडकर, बाळासाहेब गायकवाड, बाळासाहेब भुजबळ, अभिजित वाकळे, सौ. सुजाता औटी, अनिल सबलोक, सुनिल तावरे, राजेंद्र फुलारे, संतोष गेनप्पा, निरज राठोड, मैड काका, सुनिल तावरे, ज्ञानेश्वर धिरडे आदीसह नागरिक व महिला मुले उपस्थित होते.

प्रथमत: स्वातंत्र्यवीर सावरकांच्या पुतळयास स्वातंत्र्यसैनिकांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून तिरंगा रॅलीस प्रारंभ झाला. स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, चितळे रोड, नेता सुभाष चौक, तेलीखुंट, इमारत कंपनीतील टिळकांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून कापडबाजार येथे रॅलीची सांगता करण्यात आली. यात ‘आतंकवाद को हराऐगा भारत’, मारी चोट ठिकाने पे, यम गिरा निशाने पे’ या सारखे फलक हातात होते

रॅलीमध्ये अहिल्यानगरवासी सहभागी झाले होते. प्रत्येकाच्या हातात तिरंगा झेंडा होता. तसेच १५० फुटी झेंडा हे याचे मुख्य आकषण होते.

# ‘अटल टिंकरिंग लॅब योजने’अंतर्गत नीती आयोगाची १० शाळांना मान्यता

नगर – नीती आयोगाच्या अटल इनोवेशन मिशन अंतर्गत अटल टिंकरिंग लॅब उभारणीसाठी दहा शाळांच्या प्रस्तावांना मंजुरी मिळाली असून लवकरच या शाळांना प्रत्येकी १२ लाख रुपयांचे अनुदान प्राप्त होणार आहे, अशी माहिती विकासवर्धिनी संस्थेचे संचालक विनायक देशमुख यांनी दिली.

नीती आयोगाच्या अटल इनोवेशन मिशनचे संचालक डॉ. चिंतन वैष्णव यांच्या स्वाक्षरीने अटल टिंकरिंग लॅब साठी मंजुरी मिळालेल्या शाळांमध्ये अहिल्यानगर जिल्हा (४), बुलढाणा जिल्हा (३), जळगाव जिल्हा (१), बीड जिल्हा (१) व पालघर जिल्हा (१) अशा दहा शाळांचा समावेश आहे.

या शाळांमध्ये प्रामुख्याने १) श्री संत निळोबाराय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राळेगणसिद्धी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर, २) वडझिरे इंग्लिश मीडियम स्कूल, वडझिरे, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर ३) गुरुदत्त इंग्लिश मीडियम स्कूल, शिरसगाव, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर ४) बाळासाहेब वाणी सेंट्रल स्कूल, गणेगाव, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर ५) स्व. उमाकांत मस्कुजी बुरुंगले इंग्लिश मेडियम स्कूल, शेगाव, जि. बुलढाणा ६) बाबूमिया शिराजुद्दीन पटेल विद्यालय, पिंपळगाव काळे, ता. जळगाव जामोद जि. बुलढाणा ७) सिराजुद्दीन बापूमिया पटेल गुरुजी विद्यालय, वडगाव गड, ता. जळगाव जामोद, जि. बुलढाणा ८) अनिशा ग्लोबल स्कूल, आष्टी, जि. बीड ९) हज्रन शकीलाबी अब्दुल वाहिद देशपांडे इंग्लिश मीडियम स्कूल, भुसावळ जि. जळगाव १०) ज्ञानगंगा हायस्कूल, जव्हार, जि. पालघर या शाळांचा समावेश आहे.

नीती आयोगाकडे या शाळांचे प्रस्ताव फेब्रुवारी– मार्च २०२५ मध्ये सादर करण्यात आले होते. या शाळांना आता विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व गणित या विषयांच्या अद्यावत प्रयोगशाळा उभारणीसाठी पहिल्या वर्षी रु. १२ लक्ष व त्यानंतर पुढील ४ वर्ष प्रत्येकी रु.२ लक्ष, असे एकूण २० लक्ष रुपयांचे अनुदान मिळणार आहे. शाळांनी बँक संदर्भातील आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर लवकरच रु.१२ लक्ष रुपयांचा अनुदानाचा पहिला हप्ता या शाळांकडे वर्ग करण्यात येणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने यावर्षीच्या अर्थसंकल्पात देशात प्रतिवर्षी १०,००० अटल टिंकरिंग लॅब उभारण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्या अंतर्गत राज्यात आणि प्रामुख्याने अहिल्यानगर जिल्ह्यात जास्तीत जास्त अटल टिंकरिंग लॅब मिळवून देण्यासाठी विकासवर्धिनी प्रयत्न करणार आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (CBSE) किंवा राज्य शिक्षण मंडळाच्या मान्यता असलेल्या अनुदानित व विनाअनुदानित शाळांना या योजनेचा लाभ घेता येईल.

इच्छुक संस्थांनी ९४२२२२२६९५ या क्रमांकावर संपर्क साधावा. मे २०२५ अखेर आणखी २५ संस्थांचे प्रस्ताव नीती आयोगाकडे सादर करण्यात येणार आहेत, अशी माहिती संस्थेची संचालक विनायक देशमुख यांनी दिली.

# अवतार मेहेरबाबा यांच्या केंद्रात २१ मे रोजी फिल्मोत्सवचे आयोजन

नगर – अहिल्यानगर येथील अवतार मेहेरबाबा अहिल्यानगर केंद्र, सरोष पेट्रोल पंपाजवळ, झेंडिगेट येथे २१ मे रोजी सायंकाळी ७:०० ते ९:०० वाजता या दरम्यान सर्व ईश्वरप्रेमींना अवतार मेहेरबाबांच्या जीवनावर आधारीत मेहेराबाद येथे तयार झालेले लघुचित्रपट दाखविण्यात येणार आहे.

**मेहेरा : बाबांच्या शिष्या :** मेहेरा माझ्यावर प्रेम करते जसे मला प्रेम करावयास हवे. जशी सीता रामासाठी होती, राधा कृष्णासाठी होती, मेरी जिझससाठी होती, मेहेरबाबांच्या या आगमनासाठी मेहेरा प्रमुख भुमिका बजावते. देवमातेचे निवडलेले समकक्ष असण्याची ही भुमिका, सर्वोच्च, शुध्द, सर्वात आध्यात्मिक नातेसंबंध आहे, ज्यामध्ये एक दैवी प्रेम आहे, ज्याची जग कधीच कल्पना करुच शकत नाही.

एक सुंदर फिल्म जी मेहेरा जे. ईराणी यांची असुन, जिचे वर्णन त्यांची भाची, बाबांच्या महिला शिष्या मेहरु यांनी केलेले आहे. स्क्रिप्ट मेहरु ईराणी आणि स्टिव्ह एडलमेन ४२ मिनीटे.

**अवतार मेहेरबाबा की जय :** ‘रिफ्लेक्शनस् ऑन द स्पिरीच्युअल सिग्नीफिकन्स ऑफ द प्राग ओक्लाहोमा ॲक्सिडेंट’ या माहितीपटातील मार्क त्रिच्का, लिसा ब्रेंडे आणि क्लिफ हॅकफोर्ड यांच्यासह जेमी नेवेल यांच्या हृदयस्पर्शी गाण्यांचा एक संगीत व्हिडीओ. वेळ ७ मिनीटे

**माझे सर्वात मोठे दुःख :** २४ मे १८५२ मधील अमेरिकेतील ओक्लाहोमा येथील प्रागमधील अवतार मेहेरबाबांच्या पहिल्या गंभीर कार अपघाताबद्दल एक विशेष माहितीपट वेळ १ तास.

‘अवताराला त्याची हाडे मोडणे आणि रक्त अमेरिकेच्या भुमिवर सांडणे हे ठरले होते.’ कुठलीही प्रवेश फी नाही. सर्व ईश्वरप्रेमींचे हृदयपूर्वक स्वागत आहे. जय मेहेरबाबा!

# विनापरवाना टाकलेल्या केबल तोडण्याची कारवाई मनपाकडून सुरू

## कंपन्यांवर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करणार : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

नगर – शहरातील महानगरपालिकेच्या मालकीच्या पथदिव्यांच्या खांबावरील इंटरनेट व टीव्ही केबल, तसेच इतर वाहिन्या संबंधितांनी तत्काळ काढून घ्याव्यात. महानगरपालिकेने विनापरवाना केबल टाकणाऱ्या कंपन्यांवर कारवाई सुरू केली आहे. विनापरवाना केबल तोडून हटवण्यात येत आहेत. त्यामुळे संबंधितांनी तात्काळ अनधिकृत केबल काढून घ्याव्यात, अन्यथा कायदेशीर व दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे.

अहिल्यानगर शहरात सर्वत्र महानगरपालिकेचे पथदिव्यांचे खांब आहेत. शहरातील जाणाऱ्या प्रमुख रस्ते व महामार्गांवरही पथदिव्यांचे खांब आहेत. अनेक टीव्ही केबल कंपन्या व इंटरनेट सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांकडून त्यांच्या केबल टाकण्यासाठी बेकायदेशीरपणे महानगरपालिकेच्या खांबांचा वापर केला जात आहे. सदर खांबांवरून महानगरपालिकेच्या पथदिव्यांच्या वीज वाहक तारा टाकलेल्या असतात. त्याच ठिकाणी कोणतीही परवानगी न घेता धोकादायक पद्धतीने या केबल टाकण्यात आल्या आहेत. त्यामुळे एखादा अपघात किंवा मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पथदिव्यांच्या खांबांवरून या केबल हटवणे आवश्यक आहे.

त्यामुळे शहरातील सर्व टीव्ही व इंटरनेट केबल टाकणाऱ्या कंपन्यांनी तात्काळ सदरच्या केबल काढून घ्याव्यात. महानगरपालिकेने अशा केबल हटवण्यासाठी कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. या केबल कट करून काढण्यात येत आहेत. या कारवाईमुळे कोणतीही सेवा विखंडित झाल्यास, यामुळे कोणत्याही प्रकारचे व कोणाचेही नुकसान झाल्यास त्याला महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. ज्या केबल चालकांना अथवा इंटरनेट कंपन्यांना केबल टाकायच्या असतील, त्यांनी महानगरपालिकेकडे अर्ज करून परवानगी घ्यावी व निश्चित करून दिलेल्या जागांवरूनच केबल टाकण्यात यावी अन्यथा महानगरपालिका संबंधित कंपन्यांवर कायदेशीर कारवाई करेल. तसेच दंड ही आकारण्यात येईल व केबलही तोडून टाकण्यात येतील, असा इशारा यशवंत डांगे यांनी दिला आहे.



विनापरवाना टाकलेल्या केबल तोडण्याची कारवाई करताना महानगरपालिकेचे कर्मचारी.



# मस्त पोटॅटो पास्ता

झटपट रेसिपी

दोस्तांनो, तुम्हाला पास्ता आवडतो का? मग ही हंगेरियन डिश तुमच्यासाठी आहे. अगदी कमी घटकांचा वापर करून तुम्ही ही डिश बनवू शकता.

**सामग्री:** फ्लॅट पास्ता, २ बटाटे, एक चिरलेला कांदा, मिरपूड, लाल पॅपरिका, चवीनुसार मीठ आणि तेल.

**कृती:** पास्ता पाण्यात शिजवून घ्या. पास्ता शिजवण्याची कृती पाकिटावर दिलेली असते. बटाट्याची सालं काढून त्यांचे छोटे तुकडे करा. एका भांड्यात पाणी घ्या. गॅसवर ठेवा. पाणी उकळल्यावर त्यात बटाट्याचे तुकडे घाला. मऊ शिजू द्या. पाणी काढून टाका. आता हे बटाटे कुस्करून घ्या. कढईत थोड तेल घ्या. त्यात चिरलेला कांदा घालून दोन मिनिटं परता. आता यात कुस्करलेले बटाटे घाला. नीट हलवून घ्या. त्यात मिरपूड, मीठ आणि लाल पॅपरिका घाला. सर्व नीट शिजल्यावर कढईत पास्ता घाला. सगळं नीट मिक्स करा. गॅस बंद करा आणि गरमागरम पोटॅटो पास्ता खा.




## फंडू एसएमएस

धड़कने लगे दिल की तारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो।

उनकी चाहत में हम
कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं,
हम अकेले भी नहीं।

खामोश सा शहर और
गुफ्तगू की आरज़ू,
हम किससे करे बात
कोई बोलता ही नहीं।

# इच्छाशक्तीच्या जोरावर बनला रोइंग चॅंपियन

अचिव्हर



केरळमधील ॲलेप्पी येथे अलिकडेच झालेल्या इनडोअर रोइंग स्पर्धेत महाराष्ट्राच्या आदित्य केदारी यांनी रौप्यपदक पटकावलं. राष्ट्रीय स्पर्धेचं रौप्यपदक मिळवणं ही अभिमानाचीच गोष्ट असते, पण आदित्य केदारी यांच्या बाबतीत ही बाब आणखी विशेष ठरते. ते ३९ वर्षांचे असून त्यांनी रोइंग खेळायला गेल्याच वर्षीच सुरूवात केली आहे. सामान्यत: खेळाडू निवृत्त होतात त्या वयात त्यांनी हा खेळ खेळायला सुरूवात केली आणि अल्पावधीतच राष्ट्रीय स्पर्धेत रौप्य पदकाला गवसणी घातली, हे नक्कीच कौतुकास्पद आहे. याशिवाय २०२२, २०२३ आणि २०२४ अशी सलग तीन वर्षं त्यांनी नेमबाजी (आर्चरी) या क्रीडाप्रकारातही राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक मिळवलं आहे.

केदारी पुण्याच्या एम आय टी ए डी टी विद्यापीठातील स्कूल ऑफ लॉ येथे प्राध्यापक म्हणून काम करतात. वयाच्या अठराव्या वर्षापासून नियमित व्यायाम केल्यामुळे त्यांचं शरीर पिळदार आहे. गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये त्यांना सर्वप्रथम इनडोअर रोईंगची माहिती मिळाली. एमआयटी एडीटी विद्यापीठाचे रोईंग प्रशिक्षक संदीप भापकर यांनी फिटनेस पाहून त्यांना रोईंगमध्ये भाग घेण्याची विनंती केली. त्यांनी केदारी यांच्या स्टॅमिना आणि वेगासाठी व्यायाम आणि श्वासोच्छ्वासाचं तंत्र यावर खूप मेहनत घेतली. जूनमधील राज्यस्तरीय ५०० मीटर प्रकारात आदित्य केदारी यांच्या संघाने सुवर्णपदक मिळवलं परंतु २००० मीटर स्पर्धेत त्यांना पदक मिळू शकलं नाही. त्यानंतर जुलैमध्ये म्हणजे सराव सुरू केल्यानंतर अवघ्या तीन महिन्यांनीच रोइंगची राष्ट्रीय स्पर्धा होती. या स्पर्धेत ५०० मीटर प्रकारात त्यांचं पदक केवळ एका सेकंदाने हुकलं. तर २००० मीटर स्पर्धेत त्यांच्या संघाचा चौथा क्रमांक आला. राष्ट्रीय स्पर्धेत पदकं मिळवलेल्या स्पर्धकांची एशियन चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी थेट निवड होते, परंतु चौथा क्रमांक मिळाल्यामुळे आदित्य केदारी यांना ती संधी मिळू शकली नाही.

यावेळी भारताचे राष्ट्रीय प्रशिक्षक इस्माईल बेग यांनी त्यांना एशियन चॅंपियनशीप स्पर्धेत ३२ ते ३९ वयोगटात म्हणजेच 'मास्टर्स' या गटात खेळण्याचा सल्ला दिला. परंतु ही स्पर्धा मलेशियामध्ये होणार असल्याने त्यासाठी सुमारे एक लाख रुपयांचा खर्च अपेक्षित होता. हा खर्च स्पर्धकालाच करावा लागणार होता. मग एम आय टी ए डी टी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. मंगेश कराड यांनी या स्पर्धेसाठीच्या तयारीचा आणि मलेशियाला जाऊन येण्याचा सर्व खर्च विद्यापीठाद्वारे केला जाईल, असं जाहीर केलं. राष्ट्रीय स्पर्धेनंतर एका महिन्यातच एशियन चॅम्पियनशिप स्पर्धा होती. तरी या स्पर्धेत सुवर्णपदकाला गवसणी घालण्याचा निर्धार केदारी यांनी व्यक्त केला. स्पर्धेच्या तयारीदरम्यान त्यांना पाठीचे स्नायू दुखावणं, विषाणू संसर्ग होणं अशा अनेक संकटांचा सामना करावा लागला. त्यात पहिल्याच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळण्याचं नैसर्गिक दडपणही होतं. पण शेवटी या सर्व संकटांवर मात करून त्यांनी ५०० मीटर प्रकारात देशासाठी पहिलं सुवर्णपदक मिळवलं. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजेश एस, क्रीडा संचालक प्रा. पद्माकर फड, आणि स्कूल ऑफ लॉच्या डीन डॉ. सपना देव यांनी केदारी यांना विशेष सहकार्य केलं.

व्हॉट्स न्यू?

### पन्नास वर्षं टिकणारी बॅटरी



स्मार्टफोन, ड्रोन किंवा सेन्सर्स वापरत असताना सर्वात मोठा त्रास कोणता वाटतो? अर्थातच चार्जिंग! वारंवार चार्ज करावी लागणारी बॅटरी ही आजच्या युगात एक सामान्य समस्या झाली आहे; पण याच समस्येवर आता चीनमधील एका 'स्टार्टअप'ने जबरदस्त तोडगा काढला आहे. या कंपनीने तब्बल ५० वर्षे चार्ज न करता वापरता येईल अशी बॅटरी विकसित केली आहे. बीजिंगमध्ये असलेल्या 'बीटावॉल्ट' या 'स्टार्टअप'ने ही बॅटरी तयार केली असून ती एक 'न्युक्लियर बॅटरी' आहे. ही बॅटरी एखाद्या नाण्याइतकी लहान आहे. 'बीटावॉल्ट'ने दिलेल्या माहितीनुसार इतक्या कालावधीसाठी अखंड वीज पुरवू शकणारी ही जगातली पहिली बॅटरी आहे. यामध्ये कोणतीही देखभाल किंवा वारंवार चार्जिंग आवश्यक नाही.

# फॉर्मल कपडे घालताय?

ग्रुमिंग

फॉर्मल कपडे घालण्याच्या आणि आकर्षक दिसण्याच्या बाबतीत अनेक पुरूष वेंधळे असतात. बऱ्याच वेळा, चुका केल्यानंतरच काय योग्य आहे, हे त्यांना समजतं. तुम्हाला देखणं दिसायचं असेल आणि कोणतीही चूक करायची नसेल, तर कपडे घालण्याचे सात नियम नक्कीच जाणून घ्या. त्यामुळे तुमचा लूक रोजच्या ऑफिस पोशाखातही आकर्षक दिसेल.

*** टायची लांबी**

टायची लांबी खूप महत्त्वाची असते. परिपूर्ण लूकसाठी, तुम्हाला टायची योग्य लांबी माहीत असणं आवश्यक आहे. तुमच्या टायची लांबी तुमच्या बेल्ट बकलपर्यंत असावी. यापेक्षा लहान किंवा जास्त लांबीचा टाय चुकीचा आहे. टाय परिधान केल्यानंतर जॅकेट किंवा ब्लेझरचं वरचं बटण लावू नये. यामुळे लूक अधिक चांगला दिसतो.

*** ब्लेझर स्लीव्हज**

आपण ब्लेझर घालतो, तेव्हा शर्टची कफ लाइन ब्लेझरच्या स्लीव्हच्या खाली अर्धा इंच दिसली पाहिजे. तरच तो एक परिपूर्ण लूक मानला जातो.

*** मॅचिंग मोजे**

तुमचे मोजे नेहमी तुमच्या पॅंटच्या रंगाशी मॅच झाले पाहिजेत, बुटांच्या रंगाशी नाही. तुम्ही तपकिरी रंगाची पॅंट घातली असेल, तर मोज्यांचा रंगही तपकिरी असावा.

*** जॅकेटची फिटींग**

तुमचे जॅकेट फिट बसते, की नाही हे ओळखण्याची सोपी पद्धत आहे.





# अभ्यास करताना या ट्रिक्स वापरा

स्टडी टिप्स

अनेकदा विद्यार्थी अभ्यास करायला अजिबात आवडत नाही, अशी तक्रार करतात. ते अभ्यास करायला बसतात तेव्हा त्यांचं लक्ष लवकर विचलित होतं आणि ते अभ्यास करू शकत नाहीत. ही समस्या जवळजवळ प्रत्येक विद्यार्थ्याला जाणवते. ही समस्या केवळ अभ्यासावरच परिणाम करते असं नाही, तर विद्यार्थ्यांच्या भविष्यावरही परिणाम करू शकते. अर्थात त्यावरही उपाय आहे.

अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे अनेक मार्ग आहेत. त्यांचा अवलंब करून तुम्ही प्रभावीपणे अभ्यास करू शकता.

*** ध्यान करा**

अभ्यास सुरू करण्यापूर्वी ध्यान केल्यास मन अधिक एकाग्र होईल आणि अभ्यास करताना लक्ष विचलित होणार नाही. ध्यान मनाला शांत आणि स्थिर ठेवते त्यामुळे तुम्ही अधिक सहजपणे अभ्यास करू शकाल. ध्यान केल्याने स्मरणशक्तीदेखील सुधारते. त्यामुळे माहिती चांगल्या प्रकारे लक्षात ठेवता येते. परीक्षेदरम्यान मन सक्रीय आणि एकाग्र राहतं. त्यामुळे परीक्षेत चांगलं यश मिळतं.

*** अभ्यासातून ब्रेक घ्या.**

सतत अभ्यास केल्याने मन आणि डोळे थकू शकतात. म्हणून लहान ब्रेक घेणं महत्वाचं ठरतं. विश्रांतीदरम्यान, तुम्ही थोडं फिरायला जाणं, हलका नाश्ता करणं किंवा मनोरंजनाची साधनं वापरणं अशी कामं करू शकता. त्यामुळे तुमचं मन ताजंतवानं होईल आणि तुम्ही पुन्हा अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकाल.

*** नियोजन करा**

चांगली योजना बनवून अभ्यास प्रभावी आणि व्यवस्थित करता येतो. तुम्ही ध्येयांसाठी स्पष्ट योजना बनवता, तेव्हा तुम्हाला अधिक प्रेरणा आणि आत्मविश्वास मिळतो. अभ्यास केंद्रित आणि प्रभावी करण्यासाठी दीर्घकालीन ध्येयांसह दररोज एक छोटी योजना बनवली पाहिजे.

*** 'सोशल मीडिया'पासून अंतर ठेवा**

मोबाईल किंवा लॅपटॉप वापरून अभ्यास करत नसाल, तर त्यांना अभ्यासाच्या वेळी दूर ठेवा.

स्मार्ट टिप्स

### मोफत वायफाय वापरताय?

विमानतळ, कॅफे किंवा मॉलमध्ये मोफत पब्लिक वाय-फाय वापरत असाल, तर सावध व्हा. मोफत वाय-फाय सोयीस्कर वाटत असलं, तरी ते धोकादायक ठरू शकतं. केंद्र सरकारने याबाबत सावधानतेचा इशारा देताना पब्लिक वाय-फायवर बॅंकिंग किंवा आर्थिक व्यवहार करू नये, असा सल्ला दिला आहे. यामुळे आपली वैयक्तिक माहिती चोरली जाऊ शकते. अनेक 'पब्लिक वाय-फाय नेटवर्क' सुरक्षित नसतात. हॅकर्ससाठी ही नेटवर्क्स सोपे लक्ष्य असतात. सायबर गुन्हेगार उपकरण हॅक करून पासवर्ड, वैयक्तिक माहिती किंवा बॅंक तपशील चोरू शकतात. यामुळे डेटा चोरी किंवा आर्थिक नुकसान होऊ शकतं. अगदी ईमेल तपासणं किंवा 'सोशल मीडिया'वर लॉग इन करणंही जोखमीचं ठरू शकतं.




ॲप वर्ल्ड

### व्हॉट्सॲप कॉल रेकार्ड करायचाय?


'व्हॉट्सॲप' स्वतःहून कॉल रेकॉर्ड करण्यासाठी कोणतेही अधिकृत फीचर देत नाही. त्यामुळे नॉर्मल कॉलप्रमाणे तुम्ही व्हॉट्सॲप कॉल थेट रेकॉर्ड करू शकत नाही; पण यासाठी एक वेगळा मार्ग किंवा एक 'ट्रिक' वापरता येते. 'व्हॉट्सॲप कॉल रेकॉर्ड' करण्यासाठी सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे स्क्रीन रेकॉर्डिंग. तुम्ही फोनमध्ये स्क्रीन रेकॉर्डिंग चालू केलं, तर स्क्रीनवर सुरू असणारी क्रिया आवाजासहित रेकॉर्ड होऊ शकते. त्यात 'व्हॉट्सॲप कॉल'चं संभाषणही असू शकतं. आजकाल स्मार्टफोन कंपन्या अनेक फोनमध्ये 'स्क्रीन रेकॉर्डिंग'ची सुविधा पुरवतात. फोनच्या सेटिंग्ज किंवा नोटिफिकेशन पॅनलमध्ये ही सुविधा तपासता येईल. हे फीचर मिळाल्यावर व्हॉट्सॲप कॉल्स सहज रेकॉर्ड करता येतील. फोनमध्ये ही सुविधा नसेल तर 'थर्ड पार्टी स्क्रीन रेकॉर्डिंग' या मोबाईल ॲपचा उपयोग करता येईल. हे ॲप इन्स्टॉल' करताना पुढील सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे




*ॲप इंस्टॉल करण्यापूर्वी त्याचे रिव्ह्यूज आणि डेव्हलपर तपासा.
* कोणत्याही संशयास्पद ॲप्सपासून दूर राहा.
* ॲपने मागितलेली परवानगी नीट तपासा.

# हा व्यवहार ठरेल का?

मॅच मेकिंग



ऑनलाईन डेटिंग ॲपवरून माझी एका सुंदर मुलीशी ओळख झाली. आम्ही चॅट करू लागलो. आमचे स्वभावही जुळत असल्याने मी हा संवाद पुढे सुरू ठेवला. आठवड्याभराने आम्ही एकमेकांना मोबाईल नंबर दिले. तिच्याशी फोनवर बोलायला मी खूपच उत्सुक आहे. तिच्या सौंदर्यावर मी भाळलो आहे. पण मला तिने मोठा धक्का दिला. फोनवर संवाद सुरू करण्याआधी खात्यात ५०० रुपये जमा कर, असा मेसेज तिने पाठवला. मला तिला जाणून घ्यायचं आहे. पण कोणी अशाप्रकारे पैसे कसे काय मागू शकतं? तिला पैसे पाठवणं हा मूर्खपणा ठरेल हे मी जाणतो. पण मला हे करावंसं वाटतंय. तिच्याशी बोलण्याची खूप इच्छा आहे. मी काय करू?

**उत्तर** : मित्रा, इथे तुझ्याकडे दोन पर्याय आहेत. एक म्हणजे ५०० रुपये देऊन तिच्याशी बोलणं सुरू करायचं किंवा पैसे न देण्याचा निर्णय घ्यायचा. पैसे दिले नाहीत तर ती तुझ्याशी बोलणार नाही. या नात्याकडे तू कशापद्धतीने बघतोस यावर पुढचा निर्णय अवलंबून आहे. या नात्याकडे तू गंमत म्हणून बघत आहेस का तुला याचं गांभीर्य आहे हे आधी ठरव. तसंच तिच्याशी बोलण्यासाठी तू किती पैसे देणार आहेस? भविष्यात ही रक्कम वाढूही शकते. सध्या तू तिच्या सौंदर्याकडे आकर्षित झाला आहेस. पण पुढे तू या नात्यात अधिक गुंतशील. या नात्यातल्या तुझ्या आणि तिच्या अपेक्षा जुळल्या तर तिला पैसे देऊन तू पुढे जाऊ शकतोस. पण यातल्या धोक्याची जाणीव झाली असेल तर वेळीच थांबणं योग्य ठरेल.

# दिल्लीनजीकची पर्यटनस्थळे

भटकंती



दैनंदिन धावपळीच्या जीवनात, लोक आराम करण्यासाठी आणि थकवा दूर करण्यासाठी दीर्घ वीकेंडची वाट पाहतात. दिल्लीपासून दोन-तीन दिवसांत काही चांगली ठिकाणं पाहायची असतील, तर काही चांगले पर्याय आहेत.

*** ऋषिकेश** : उत्तराखंड राज्यात ऋषिकेश हे एक आध्यात्मिक केंद्र आहे. योग आणि ध्यानधारणेसाठी ते एक लोकप्रिय ठिकाण आहे. हे गंगा नदीच्या काठावर वसलेलं असून सुंदर टेकड्या आणि जंगलांनी वेढलेलं आहे. रस्तयाने तिथे पाच-सहा तासांत पोहोचता येतं.

*** जयपूर**: गुलाबी शहर म्हणून ओळखलं जाणारं जयपूर कपडे, हस्तकला आणि पारंपारिक राजस्थानी दागिन्यांसाठी प्रसिद्ध आहे. तुम्हाला शाही वास्तुकला आणि चविष्ट जेवण यांचा आस्वाद घ्यायचा असेल तर दिल्लीजवळील या सुंदर शहराला भेट देऊ शकता. पाच तासांत तिथे पोचता येतं.

*** लॅन्सडाऊन** : हे दिल्लीजवळील शांत हिल स्टेशन आहे. इथे तुम्हाला पाइनच्या झाडांनी भरलेल्या टेकड्या आढळतील. मुख्य म्हणजे इथे गर्दी कमी आहे. स्वतःला डिटॉक्स करण्यासाठी इथे निसर्ग पाहायला जाऊ शकता. सात तासांत तिथे पोहोचता येतं.

*** नौकुचियाताल**: उत्तराखंडमधील नौकुचियाताल हे दिल्लीजवळील एक सुंदर पर्यटन स्थळ आहे. ते ९ कोपऱ्यांचं तलावाचं ठिकाण म्हणून ओळखलं जातं. हे भीमतालपासून फक्त पाच किलोमीटर अंतरावर आहे. नैनितालमधील सर्वात खोल तलाव म्हणजे नौकुचियाताल. हे घनदाट जंगलांनी भरलेलं आहे. इथे दुपारी बोटिंग करता येतं आणि इथे बसून गरमागरम कॉफीचा आस्वाद घेता येतो.

*** कौसानी**: कौसानी हे उत्तराखंडमधील बागेश्वर जिल्ह्यातील एक 'हिल स्टेशन' आणि लहान गाव आहे. शनिवार-रविवारी येणाऱ्या पर्यटकांसाठी हे आवडतं ठिकाण आहे. हिमालयाच्या शिखरांच्या सान्निध्यात आणि अद्भुत हवामानात दिवाळी साजरी करण्यापेक्षा चांगलं आणखी काय असू शकतं?



# वाट मर्चंट नेव्हीची

वेगळ्या वाटा

जगभरात भ्रमंती करण्यासोबतच विविध ठिकाणच्या संस्कृतींची ओळख करून घेणं मर्चंट नेव्हीतल्या करीअरमुळे शक्य होतं. मर्चंट नेव्ही हा करीअरचा धाडसी पर्याय आहे. यात तुम्हाला वर्षातले सहा महिने बोटीवर रहावं लागतं. चहूबाजूला निळंशार पाणी खुणावत असतं. म्हणूनच उत्तम आणि धाडसी करीअरच्या विचारात असाल तर मर्चंट नेव्हीचा मार्ग तुम्ही निवडू शकता.

मर्चंट नेव्हीमध्ये डेक कॅडेट किंवा नॅव्हिगेटिंग अधिकारी म्हणून तुम्ही काम करू शकता. हे अधिकारी बोट, इंधनाची टाकी, कार्गो यांच्या देखरेखीची जबाबदारी पार पाडतात. मर्चंट नेव्हीच्या माध्यमातून माल वाहतूक होते. बोटीत माल भरणं आणि उतरवणं या कामांकडे डेक कॅडेटला लक्ष ठेवावं लागतं. पुरेशा अनुभवानंतर तुम्ही थर्ड ऑफिसर, सेकंड ऑफिसर आणि चीफ ऑफिसर अशी पदं मिळवू शकता. मर्चंट नेव्हीमध्ये जाण्यासाठी फिजिक्स, केमिस्ट्री आणि गणित हे विषय घेऊन बारावी उत्तीर्ण होणं गरजेचं आहे. यासोबतच बीएससी नॉटिकल सायन्स, बीएससी मरीन, बीएससी मरीन केटरिंग असे अभ्यासक्रम पूर्ण करू शकता.

त्यानंतर इंडियन मेरिटाइम युनिव्हर्सिटीतर्फे आयोजित करण्यात येणारी आयएमयू-सीईटी प्रवेश परीक्षा तुम्ही देऊ शकता. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर या विद्यापीठाशी संलग्न कॉलेजमधून नॉटिकल सायन्समध्ये बीएससी करू शकता. जेईई परीक्षाही तुम्हाला देता येईल. एक कॅडेट म्हणून अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर बोटीवर रूजू होण्याआधी तुम्हाला मेरिटाइम प्रशिक्षण संस्थेतून एक वर्षाचं प्री-शीप ट्रेनिंग घ्यावं लागेल. यासोबतच तुम्ही ज्युनिअर इंजिनिअर म्हणूनही काम करू शकता. पुढे थर्ड इंजिनिअर, सेकंड इंजिनिअर आणि चीफ इंजिनिअर ही पदं मिळू शकता.

# घामामुळे फॅट्स कमी होतात

फिटनेस फंडा



खूप घाम आला की वजन कमी होतं, असा एक समज असतो. त्यामुळे बरेच जीम ट्रेनर्स उन्हाळ्यात भरपूर व्यायाम करण्याचा सल्ला देतात. हिवाळ्यात वजन वाढत असल्याचं अनेकांचं म्हणणं असतं. पण हे फक्त गैरसमज आहेत. फॅटलॉसची नेमकी प्रक्रिया काय हे आपण समजून घेऊ.

घामामुळे कॅलरी खर्च होत असतील तर हिवाळ्यात शरीरातली एकही कॅलरी खर्च होणार नाही. कारण थंडीत घाम येतच नाही. थंड प्रदेशात रहाणाऱ्यांची यामुळे चांगलीच पंचाइत होईल. घाम कसा गाळायचा असा प्रश्न त्यांना पडेल. लो कॅलरी डाएट घेतल्यानंतर कमी झालेल्या कॅलरींची भरपाई शरीर करतं. आवश्यक असलेली ऊर्जा मिळवण्यासाठी मग शरीर साठलेल्या चरबीचा वापर करतं. शरीरात कमी प्रमाणात कॅलरी गेल्या तर ऊर्जेसाठी साठवलेल्या फॅट्सचा वापर सुरू होतो आणि वजन कमी होतं. या प्रक्रियेशी ऋतूचा काहीच संबंध नसतो.

घामाच्या माध्यमातून चरबी जाळली जात नाही. शरीराचं तापमान नियंत्रित ठेवण्याचं एक माध्यम म्हणजे घाम. उन्हाळ्यात बाहेरचं तापमान जास्त असल्याने आपल्याला घामाच्या धारा लागतात. याचा व्यायामाशी काहीच संबंध नसतो. शरीर आतून थंड रहाण्याचा प्रयत्न करत असल्याने उन्हाळ्यात व्यायाम करताना थोडा जास्त घाम येतो. हिवाळ्यात शरीर आधीच थंड असतं. त्यामुळे घाम जास्त येत नाही.

मात्र घाम न येणं हे हिवाळ्यात वजन वाढण्याचं कारण ठरत नाही. हे सर्वस्वी आपल्या आहारावर अवलंबून असतं. या काळात जास्त कॅलरीयुक्त आहार घेतला तर वजन वाढतं. कॅलरी कमी ठेवल्या तर वजन नियंत्रित रहातं किंवा कमी होतं. फरक इतकाच की उन्हाळ्यात आपण जास्त पाणी पितो. तुम्ही खूप तीव्र स्वरूपाचा व्यायाम करत असाल तर शरीरातला ओलावा टिकवून ठेवण्यासाठी भरपूर पाणी प्यायला हवं.

# विविध मागण्यासाठी कृषि सहाय्यकांचे बेमुदत काम बंद आंदोलन; मागण्यांची पूर्तता झाली नाही तर कृषी आयुक्त कार्यालयावर मोर्चा

नगर – कृषी सहाय्यकांची कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे समवेत १०/०२/२०२५ रोजी बैठक घेण्यात आली होती. यामध्ये कृषि सहाय्यकांच्या मागण्यांची सोडवणूक १५ दिवसांमध्ये पूर्ण करण्याचे आश्वासन मंत्र्यांनी दिले होते. परंतु अद्यापही या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटनेच्या वतीने कृषी सहायकांचे राज्यभर जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येत आहे. अहिल्यानगर महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेच्या वतीने येथील कृषी कार्यालयासमोर कृषी सहायकाने आपल्या विविध मागण्यांसाठी बेमुदत काम बंद धरणे आंदोलन पुकारले आहे.



महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटना (जिल्हा अहिल्यानगर) च्या वतीने कृषी सहाय्यकांच्या विविध मागण्यांसाठी जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात आले. (छाया – समीर मन्यार)

कृषी सहाय्यकांच्या मागण्या खालील प्रमाणे – कृषि सेवक कालावधी रद्द करुन कृषि सेवकांना नियमित कृषि सहाय्यक पदावर नियुक्ती देण्यात यावी, कृषि सहाय्यकांचे पदनाम बदलून सहाय्यक कृषि अधिकारी करणे, कृषि विभागामधील संपूर्ण कामकाज Digital स्वरुपात होत असतांनाही कृषि सहाय्यकांना Laptop (लॅपटॉप) दिला जात नाही, कृषि सहाय्यकांना ग्रामस्तरावर कामकाजासाठी कृषि मदतनिस देणे बाबत. (ग्रामस्तरावर समकक्ष असणाऱ्या तलाठी वव ग्रामसेवकाप्रमाणे मदतनिस मिळावा.), निविष्ठा वाटपासंदर्भात वारंवार निवेदन देवून सुध्दा त्यामध्ये सुसुत्रता येत नसून, कृषि सहाय्यकांना वाहतुक भाड्यापोटी आर्थिक भार सहन करावा लागत आहे.

तरी मार्गदर्शक सुचनेमध्ये विविध योजनेत कृषि सहाय्यक यांना वाहतुक भाड्याची तरतुद करावी किंवा निविष्ठा वाटप परमिटद्वारे करावे. अन्यथा खरीप हंगाम २०२५ मधील निविष्ठा वाटपावर संघटनेचा बहिष्कार असेल, कृषि विभागाचा आकृतीबंधास तात्काळ मंजुरी द्यावी व त्यामध्ये कृषि पर्यवेक्षक यांची पदे वाढवून कृषि सहाय्यकांच्या पदोन्नतीमधील कुंटितावस्था दूर करावी व महसुल विभागाप्रमाणे आकृतीबंध करावा. कृषि सहाय्यक कृषि पर्यवेक्षक यांचे प्रमाण ४:१ या प्रमाणे करावे, POCRA योजनेमध्ये समुह सहाय्यकांची पदे पूर्वीप्रमाणे भरण्यात यावी, चठएऋ योजनेअंतर्गत लक्षांक देतांना क्षेत्रिय स्तरावरील अडचणीचा विचार करुन लक्षांक देण्यात यावे, नैसर्गिक आपत्तीच्या पंचनामे करणे व तद्नंतर करावयाच्या कामाबाबत महसुल, ग्रामविकास व कृषि विभागाच्या जबाबदाऱ्याबाबत योग्य न्यायसंगत कार्यपध्दती तयार करण्यात यावी, सिल्लोड तालुक्यातील कृषि सहाय्यक यांनी केलेल्या आत्महत्येच्या प्रकारानंतर सदर प्रकरणाची विभागामार्फत चौकशी पूर्ण होवून सुध्दा संबंधीत अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात आलेली नाही, त्याबाबत तात्काळ कारवाई करण्यात यावी, कृषि सहाय्यक संवर्गाच्या आस्थापनाविषयक अडचणींची सोडवणूक करण्यात यावी. आदी मागण्या महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटनेच्या वतीने करण्यात आल्या आहेत. उपरोक्त प्रलंबित मागण्यांची तात्काळ सोडवणूक करावी. अन्यथा नाईलाजास्तव २१ मे रोजी आठ विभागामध्ये कृषी सहसंचालक कार्यालय समोर धरणे आंदोलन करून कृषी पुणे येथे कृषी आयुक्त कार्यालयावर राज्यभरातील कृषी सहाय्यक मोर्चा काढणार असल्याचे अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष जयवंत गदादे, कार्याध्यक्ष धनराज गुंड, कोषाध्यक्ष शरद लांबे, सरचिटणीस अजिनाथ कुंढारे, राज्य कार्यकारणी प्रतिनिधी चंद्रकांत तांदळे, राज्य महिला प्रतिनिधी सुवर्णा भोस यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटना जिल्हा अहिल्यानगर च्या वतीने कृषी उपसंचालक सागर गायकवाड यांना निवेदन देण्यात आले. यावेळी विनायक तळपाडे, तालुका अध्यक्ष युवराज शिंगटे, उपाध्यक्ष सचिन खेतमाळस, संतोष साबळे, गणेश शेंदूरकर, संतोष झेंडे, संदीप बडे, विजय शेलार, दिगंबर लोखंडे, प्रवीण काजळे, विजय साबळे, दिगंबर चव्हाण, वैभव साळवे, प्रभात अंतरे, तात्याराम गोपाळघरे, नवनाथ डोकडे, संदीप गायकवाड, तात्या माळशिकारे, प्रमोद देवकाते, उज्वला शेळके, प्रतीक कांबळे आदींसह जिल्ह्यातील कृषी सहाय्यक उपस्थित होते.

यावेळी माजी राज्यअध्यक्ष सोमनाथ बाचकर, अतुल बनकर, सतीश सरोदे, आदिनाथ धुमाळ, विजया बोर्डे, कृषी अधिकारी संघटनेचे अध्यक्ष वैभव थोरे, अनिल शेजुळ यांनी मनोगत व्यक्त केले.

# वाकोडी फाटा येथील बिंगो अड्ड्यावर पोलिसांचा छापा

### १ लाख ७४ हजार ७०० रुपयाचा मुद्देमाल जप्त, दोघांना पकडले

नगर – बिंगो जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा टाकत १ लाख ७४ हजार ७०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन दोघांना ताब्यात घेतले. ही कारवाई वाकोडी फाटा ते वाकोडी जाणाऱ्या रोडवरील, महाराजा चिकन शॉप शेजारी असलेल्या टपरीत १९ मे रोजी दुपारी करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार पथकाने वाकोडी फाटा ते वाकोडी जाणाऱ्या रोडवरील महाराजा चिकन शॉप शेजारी असलेल्या टपरीत छापा टाकला असता तेथे दोन जण बिंगो जुगार खेळताना व खेळवताना आढळून आले. पोलिसांनी त्यांना त्यांची नावे व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव सोमनाथ बापू जंगम (वय २७, रा.पटवर्धन चौक, दादा चौधरी विद्यालय जवळ, अ.नगर) आणि व्यंकटेश नवनाथ ओझा (वय २५, रा. वंजार गल्ली, अ.नगर) अशी असल्याचे सांगितले. हा बिंगो जुगार अड्डा कोणाचा आहे. असे विचारले असता त्यांनी हा जुगार अड्डा प्रदीप फरताळे (पूर्ण नाव पत्ता माहित नाही.) यांच्या सांगण्यावरुन चालवत असल्याचे सांगितले.

पोलिसांनी तेथील झडती घेतली असता झडती मध्ये २५ हजार रुपये किमतीचा सॅमसंग कंपनीचा ४२ इंची एलईडी टीव्ही, १५ हजार रुपये किमतीचा लिनोव्हा कंपनीचा सीपीयू, १ हजार रुपये किमतीचा एच पी कंपनीचा की बोर्ड, २ हजार रुपये किमतीचा एअरटेल कंपनीचा राऊटर, १ हजार ७०० रुपयाची रोकड, ३० हजार रुपये किंमतीचा रेड मी कंपनीचा मोबाईल, १ लाख रुपये किंमतीचा अँपल कंपनीचा आयफोन १३ प्रो मॉडेलचा मोबाईल असा १ लाख ७४ हजार ७०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी पो.कॉ. आकाश काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस अंमलदार नंदकुमार पठारे करीत आहेत.

# भूमिहीन समाजाच्या कुटुंबीयांना गावात घरकुलाचा लाभ द्यावा

### एकलव्य संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात व इमामपूर बहिरोबा गावात बेघर आदिवासी भिल्ल समाजाचा सर्वे करून ग्रामपंचायत हद्दीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या जागा आहे. त्यातून भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजच्या कुटुंबीयांना ग्रामपंचात हद्दीमध्ये महाराष्ट्र शासनाची जागा राहण्यासाठी मिळवून द्यावी तसेच जागा नावावर नसल्याने आदिवासी भिल्ल समाजाच्या कुटुंबीयांना घरकुलाचा लाभ देखील घेता येत नसल्याने जागा नावावर करून देण्याच्या मागणीसाठी एकलव्य संघटनेचे महाराष्ट्र संघटक मोहन गोलवाड, महाराष्ट्र संघटिका वैजयंता गोलवाड व नाशिक सभापती शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देताना जिल्हाप्रमुख एकनाथ भरडे, गोरख ठाकर, राजू ठाकर, आकाश ठाकर, भाऊसाहेब बर्डे, राजू बर्डे, शुभम पवार, गणेश पवार, किरण बर्डे, अरविंद बर्डे, संगीता ठाकर आदींसह बेघर कुटुंबीय उपस्थित होते.



भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजाच्या कुटुंबीयांना गावात घरकुलाचा लाभ द्यावा अशा आशयाचे निवेदन एकलव्य संघटनेच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, आदिवासी भिल्ल समाजाचे इमामपूर बहिरोबा मळा येथे अनेक कुटुंबीय असून त्यांच्या नावे कोणत्याही गावांमध्ये शेतजमीन अथवा घर बांधण्यासाठी जागा नावावर नाही तसेच त्यांची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने जागा विकत घेता येत नाही व उदरनिर्वाहासाठी कोणतेही साधन नसल्याने अनेक वेळा उपाशी राहावे लागते त्यामुळे इकडे तिकडे भटकंती करावी लागत असून दिवसातून एक वेळा जेवले की दुसरी वेळ उपाशी राहावे लागते त्यामुळे या कुटुंबीयांना घरकुलाचा देखील लाभ भेटत नाही. त्यामुळे जागा नावावर करून देण्यासाठी जीआर काढण्यात यावा व देशाचा आदिवासी देशाचा मालक असून त्यांना जागा राहण्यापुरती देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली असून आदिवासी भिल्ल समाजाच्या कुटुंबीयांचे सर्वे करून जागा अथवा गावातील महाराष्ट्र शासनाची जागा नावावर करण्यात यावी व घरकुलाचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# शहरातील ड्रेनेज लाईन व पावसाळी गटारांची कामे १५ दिवसात पूर्ण करा

### आयुक्त यशवंत डांगे यांचे ठेकेदाराला आदेश, माणिक चौक, आशा टॉकीज, आनंदी बाजार परिसरातील कामांची पाहणी

नगर – शहरात माळीवाडा ते माणिक चौक ते भिंगारवाला चौक, तसेच अमरधाम ते आनंदी बाजार ते जिल्हा वाचनालय या रस्त्यांची काँक्रीटीकरणाची कामे सुरू करण्यात येणार आहेत. तत्पूर्वी या ठिकाणी ड्रेनेज लाईन व पावसाळी गटारांची कामे सध्या सुरू आहेत. पावसाळा तोंडावर असल्याने येत्या १५ दिवसात ही कामे पूर्ण करावी, असे आदेश आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी ठेकेदार संस्थेला दिले आहेत. दरम्यान, या कामामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. परंतु, ३१ मे पर्यंत ही कामे पूर्ण होतील, तोपर्यंत नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही यशवंत डांगे यांनी केले आहे.



शहरातील रस्ते व पावसाळी गटारीच्या कामांचा आढावा घेताना मनपा आयुक्त यशवंत डांगे.

यशवंत डांगे यांनी सोमवारी शहरातील रस्ते व पावसाळी गटारीच्या कामांचा आढावा घेतला. विशेषतः जिल्हा वाचनालय ते आनंदी बाजार ते नालेगाव अमरधामपर्यंत सुरू असलेली पावसाळी गटार व माणिक चौक परिसरातील गटारीच्या कामाची त्यांनी समक्ष पाहणी केली. रस्त्यावर खोदाई करून चेंबर बांधले जात आहेत. त्याची कामे प्रगतीपथावर आहेत. या पावसाळी गटारीमुळे शहरातील रस्त्यांवरून वाहणारे पाणी व रस्त्यावर चौकात असणाऱ्य पाण्याचा तत्काळ निचरा होण्यास मदत होणार आहे. मागील दोन दिवसात झालेल्या पावसामध्ये काही ठिकाणी पूर्ण झालेल्या गटारीमुळे दहा ते पंधरा मिनिटात तेथे साचलेल्या पाण्याचा निचरा झाला आहे. या कामानंतर या रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाचे काम हाती घेतले जाणार आहे, असे यशवंत डांगे यांनी सांगितले.

सध्या अवकाळी पाऊस सुरू असून येत्या पंधरा दिवसात पावसाळा सुरू होणार आहे. पावसाळ्यात नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी सुरू असलेल्या कामांना गती द्यावी. १५ दिवसात म्हणजे ३१ मे पूर्वी पावसाळी गटारीची कामे पूर्ण करावीत, असे निर्देश यशवंत डांगे यांनी ठेकेदार संस्थेला दिले आहेत. महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाला, तसेच या कामावर नियुक्त असलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कंपनीलाही कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत नियोजन करण्याचे आदेश यशवंत डांगे यांनी दिले आहेत. या कामांमुळे मध्य शहरातील नागरिकांना, वाहन चालकांना त्रास सहन करावा लागत आहे. मात्र लवकरच हे काम पूर्ण होईल. शहरातील रस्ते व पावसाळी गटारी याची समस्या कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी ही कामे सुरू आहेत. त्यामुळे नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

## सिद्धार्थनगर परिसरातून अल्पवयीन मुलगी बेपत्ता

नगर – शहरातील सिद्धार्थ नगर परिसरातून एका अल्पवयीन मुलीला (वय १५) अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना १८ मे रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास घडली. पीडित अल्पवयीन मुलीच्या बहिणीने या प्रकरणी १९ मे दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीचे आई–वडील मयत झाले असून त्यांच्यावरच कुटुंबाची जबाबदारी आहे. त्यांची अल्पवयीन बहिण ही नगर शहरातील एका हायस्कूलमध्ये शिकत आहे. रविवारी ती घरातून पेप्सी आणण्याच्या बहाण्याने बाहेर गेली आणि परत आलीच नाही. आजीने फिर्यादीला ही माहिती दिल्यानंतर फिर्यादीने शहरात सर्वत्र तिचा शोध घेतला, मात्र ती कुठेच सापडली नाही. त्यामुळे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तिला फूस लावून पळवून नेले असल्याचा संशय फिर्यादीने व्यक्त केला आहे. पोलीस मुलीचा शोध घेत आहे.

# नालेसफाई की फक्त गवतसफाई?

### निखिल वारे यांचा सवाल अन्यथा आंदोलन

नगर – सध्या शहरातील विविध भागांमध्ये महानगरपालिकेच्या वतीने नालेसफाई सुरू आहे. ही नालेसफाई आहे की केवळ गवतसफाई? असा सवाल माजी नगरसेवक निखिल वारे यांनी उपस्थित केला.

अनेक ठिकाणी नाल्यांत गाळ व अडथळे कायम असताना केवळ गवत कापून फोटोसेशन करण्यात येत असल्याची टीका त्यांनी केली. ज्या ठिकाणी पाण्याचा निचरा होण्यास अडथळा येतो, तेथे योग्य ती सफाई होताना दिसत नाही. त्यामुळे संपूर्ण मोहिमेचा हेतूच फसतो आहे, असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले.



नालेसफाई कामाची पाहणी करताना माजी नगरसेवक निखील वारे आदी.

या पार्श्वभूमीवर त्यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना म्हटले आहे की, महानगरपालिकेने लाखो रुपयांचा खर्च करून सुरू केलेल्या या उपक्रमाचा नागरिकांना खरा लाभ मिळण्यासाठी ठोस आणि प्रभावी कार्यवाही होणे अत्यावश्यक आहे. नालेसफाई वरवरची गवतसफाई न राहता, खऱ्या अर्थाने अडथळे दूर करणारी ठरावी, हीच अपेक्षा आहे. अन्यथा नागरिकांना सोबत घेऊन आंदोलनाचा मार्ग अवलंब करावा लागेल, असा इशाराही निखिल वारे यांनी दिला आहे.

नगरवासीयांनीही त्यांच्या या मतास पाठिंबा दर्शवत नालेसफाईच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली आहे. आता यावर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रात्रीच्या वेळी घरात घुसून चोरट्यांनी सव्वा सहा लाखांचा ऐवज पळवला

### रोख रकमेसह सोन्या चांदीच्या दागीन्यांचा समावेश

नगर – रात्रीच्या वेळी घरात कुटुंबियांसमवेत झोपलेल्या शेतकऱ्याच्या घराचा दरवाजा कशाच्या तरी सहाय्याने उघडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश करत घरातील कपाटातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ६ लाख ३४ हजारांचा ऐवज चोरुन नेला. ही घटना नगर तालुक्यातील भोरवाडी येथे १८ मे रोजी रात्री १० ते १९ मे रोजी पहाटे ५.३० वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत किरण विश्वनाथ खैरे (वय ३८, रा. भोरवाडी, ता. नगर) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे त्यांच्या कुटुंबासह १८ मे रोजी रात्री घरात झोपलेले असताना कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी घराचा दरवाजा उघडून आत प्रवेश केला. आतील सामनाची उचकापाचक केली. घरातील लाकडी कपाटाचे लॉक तोडून आतील ४ तोळे वजनाचे सोन्याचे मनी मंगळसूत्र, १ तोळा वजनाचे सोन्याचे नेकलेस, १ तोळा वजनाचे कानातील सोन्याचे वेल व झुबे, १ तोळा वजनाच्या सोन्याच्या २ अंगठ्या (त्यात प्रत्येकी अर्धा तोळ्याची एक लेडीज एक जेन्ट्स अंगठी), १२ ग्रॅम वजनाचे कानातील ४ जोड सोन्याचे फुले, १ हजार रुपये किमतीच्या नाकातील सोन्याच्या दोन नथ, अर्धा तोळा वजनाचे लहान मुलांच्या कानातील कुडके, सोन्याचे बदाम, ३ हजार रुपये रोख रक्कम असा ऐवज चोरुन नेला.



नगर तालुक्यातील भोरवाडी येथील घरातील चोरट्यांनी फोडलेले कपाट

खैरे कुटुंबीय पहाटे झोपेतून जागे झाल्यावर त्यांना घरात चोरी झाल्याचे समजले. ही माहिती त्यांनी नगर तालुका पोलिसांना कळविली. ही माहिती मिळताच नगर ग्रामीणचे पोलिस उपअधीक्षक संपतराव भोसले, तालुका पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गिते यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात किरण खैरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३३१ (४), ३०५ (अ) प्रमाणे घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते हे करीत आहेत.

# पाईपलाईन रोडवरील बिंगो अड्ड्यावर छापा; मुद्देमालासह दोन जण ताब्यात

नगर – पाईपलाईन रोडवरील यशोदा नगर, बाजारतळ येथील बिंगो जुगार अड्ड्यावर शहर विभागाचे पोलीस उपअधिक्षक अमोल भारती यांच्या विशेष पथकाने १९ मे रोजी छापा टाकला. या कारवाईत रोख रक्कम व जुगारीचे साहित्य जप्त केले.

उपअधिक्षक अमोल भारती यांना या जुगार अड्ड्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार त्यांनी कारवाई साठी पथक पाठविले. या पथकाने यशोदा नगर बाजार तळ, पाईपलाईन रोड येथे पत्र्याचे शेडमध्ये सुरु असलेल्या बिंगो जुगार अड्डुयावर छापा टाकला असता तेथे उभा असलेल्या एक इसम व बिंगो चालक यांना जागीच पकडुन त्यांना त्यांचे नांव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नांवे राहुल नंदु इंगळे (वय ३४, बिंगो चालक), किरण एकनाथ शिदोरे (वय ३४, बिंगो खेळणारा, दोघे रा. पाईपलाईन रोड, पदमानगर) असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे ११ हजार ३७० रुपये आणि १७ हजार ५०० किंमतीचा क्राऊन कंपनीचा ४३ इंची कळ्या रंगाची एलईडी स्क्रिन व रिमोट, लिनिओ कंपनीचा काळया रंगाचा सीपीओ, एच पी कंपनीचा माऊस व किबोर्ड असा एकूण २८ हजार ८७० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी पोलीस अंमलदार महेश मगर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी राहुल इंगळे व किरण शिदोरे याचेविरुध्द महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला. ही कारवाई पोलिस उप निरीक्षक दत्तात्रय शिंदे, पोलीस अंमलदार महेश मगर, हेमंत खंडागळे, सागर द्वारके यांनी केली.

# उसने पैसे न दिल्याने डोक्यात फोडली बाटली

नगर – उसने पैसे न दिल्याच्या कारणावरुन राग आल्याने ४० वर्षीय इसमास शिवीगाळ दमदाटी करीत काचेची बाटली कपाळावर फोडून दुखापत केल्याची घटना नगर तालुक्यातील तांदळी वडगाव येथे १८ मे रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत संतोष धर्माजी साबळे (रा. तांदळी वडगाव, ता. नगर) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.फिर्यादी हे तांदळी वडगाव येथून माळवाडी वस्तीकडे जात असताना माळवाडी वस्ती जवळ हनुमंत आबा घालमे (रा. तांदळी वडगाव) हा त्यांच्याजवळ दारु पिऊन आला व म्हणाला की मला तू २०० रुपये दे, तेव्हा फिर्यादी जवळ पैसे नसल्याने फिर्यादी हे त्यांना पैसे देऊ शकले नाही. याचा राग येऊन हनुमंत घालमे याने फिर्यादीस शिवीगाळ करुन रस्त्याच्या कडेला पडलेली काचेची बाटली उचलून फिर्यादीच्या कपाळावर मारुन त्यांना जखमी केले.

याप्रकरणी संतोष साबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी हनुमंत घालमे याच्याविरुद्ध बी एन एस कलम ११८ (१), ३५२, ३५१ (२) (३) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस हवालदार सचिन वनवे हे करीत आहेत.

